३.१. जलसंपदा विभाग प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रस्तावित केलेल्या कामांची अंमलबजावणी करणे, राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठीची सर्व कामे करणे, जलसंपदा विभागांतर्गत वापरात व विकसन अंतर्गत असलेल्या विविध संगणक प्रणालीचे नियोजन, विकसन, अंमलबजावणी, संनियंत्रण इ. कामे;

३.२ जलसंपदा विभागातील दैनंदिन कामासाठी उपयुक्त बांधकाम व्यवस्थापन, सिंचन व्यवस्थापन, प्रशासन व्यवस्थापन व माहिती व्यवस्थापन विषयक प्रणाली विकसित करणे. (In house / बाह्य अभिकरणाद्वारे / खाजगी सल्लागाराच्या सेवा उपलब्ध करुन)

३.३ मंत्रालयीन अन्य विभागाने विकसित केलेल्या माहिती प्रणालीवरील माहिती, आवश्यकतेनुसार लिंक डेव्हलप करुन उपलब्ध करुन घेणे.

३.४ जलसंपदा विभागाकरीता आवश्यक software / hardware खरेदी करणे , त्याची देखभाल दुरुस्ती व व्यवस्थापनाशी निगडीत सर्व कामे;

३.५ विविध प्रणालीबाबत जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची आखणी करणे, प्रशिक्षण देणे, त्यांचे मार्फत भरण्यात येणाऱ्या माहितीचा आढावा घेणे व पडताळणी करण्यासाठी संबंधितांसोबत बैठका आयोजित करणे, तसेचयेणा-या अडचणीचे वेळोवेळी निराकरण करण्यासाठी पत्रव्यवहार करणे, इत्यादी;

३.६ जलसंपदा विभागातील विविध स्तरावर वेळोवेळी आवश्यक असणा-या विशिष्ट प्रकारच्या माहितीच्या गरजा भागविण्याकरीता Business Intelligence / Data analysis इत्यादी प्रणाली वापरुन आवश्यक असलेली माहिती संगणक प्रणालीच्या सहाय्याने संकलित करुन पृथःकरणासह मंत्रालयीन अधिकारी / कार्यकारी संचालक / क्षेत्रिय मुख्य अभियंता यांना वेळोवेळी मागणीनुसार उपलब्ध करून देणे.

४) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई (अ.अ: ज.सं.सं.मं) यांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ठ ४२ नुसार व सदर परिशिष्टात वेळोवेळी होणा-या अदयावतीकरणानुसार अधीक्षक अभियंता यांना असलेले सर्व वित्तीय अधिकार राहतील.

५) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालया मार्फत होणाऱ्या कामावर तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांचे राहील. तसेच जलसंपदा ई-प्रशासन विषयक मंत्रालय स्तरावरील कामे उप सचिव (लपा) हे पाहतील.

६) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई व त्यांचे अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाची रचना **परिशिष्ट १** मध्ये दर्शविल्यानुसार राहील. या प्रमाणे सदर कार्यालयाचे मुख्यालय मुंबई येथे राहील. तसेच एक विभागीय कार्यालय मुंबई व तीन विभागीय कार्यालये पुणे मुख्यालयात कार्यरत राहील.

७) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाचा आकृतिबंध **परिशिष्ट २** मध्ये दर्शविल्यानुसार राहील. मंडळ कार्यालयाचा कार्यभार वरील परिच्छेद ३ नुसार व विभागनिहाय सर्वसाधारण कार्यभार **परिशिष्ट २ अ** प्रमाणे राहील. सदर कार्यभाराचे अंतर्गत बदलाचे अधिकार अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई यांना राहील.

८) सदर मंडळ कार्यालय व त्या अंतर्गतच्या चारही विभागांकरीता आवश्यक असलेली आस्थापना परिशिष्ट ३ (अ, ब, ब १, ब २, ब ३) मध्ये नमूद केल्यानुसार इतर कार्यालयातील मंजूर पदामधुन वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

९) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई या मंडळाचे सहाय्यक अधीक्षक अभियंता हे सदर मंडळ कार्यालयाचे व कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई या कार्यलयाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे, कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे व कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे या ३ कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांना घोषित करण्यात येत आहे.

११) अधीक्षक अभियंता, प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई या कार्यालयातील सर्व कामे उप सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करावी.

१२) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मंत्रालय, मुंबई व कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई हे दोन्ही कार्यालये अधीक्षक अभियंता, प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयाच्या सध्याच्या जागेत कार्यरत राहील. तसेच सदर मंडळांतर्गत असलेल्या पुणे मुख्यालय येथील तिन्ही विभागीय कार्यालय जलसंपत्ती भवन, पुणे येथे उपलब्ध जागेत कार्यरत राहतील.

१३) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई व त्यांचे अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांचा संपूर्ण आस्थापनेचा व कार्यालयीन खर्च हा ई - प्रशासनाकरीता उपलब्ध असलेल्या **लेखाशीर्ष ३४५१ - सचिवालयीन आर्थिक सेवा ९० - सचिवालय (०१) जलसंपदा विभाग (०१)(०३) ई - गर्व्हनन्स प्रकल्प - १७ संगणक खर्च योजनांतर्गत (३४५१ - २७१९)** या लेखाशीर्षातून भागविण्यात यावा.

१४) सदर आदेश आदेशाचे दिनांकपासून अमलात येतील . वर्ग केलेल्या रिक्त पदावर सुयोगय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती सक्षम स्तरावरून स्वतंत्ररीत्या करणेत येईल.

हा शासन निर्णय संदर्भ क्र ५ नुसार जलसंपदा विभागास दिलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०४०२१२१५१०१५२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षंकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Madhukar Belsare

( डॉ.संजय बेलसरे )
शासनाचे उपसचिव (लपा)

प्रत माहितीसाठी :-

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्य मंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव

५) प्रधान सचिव (जसंवि व प्र), जलसंपदाविभाग, मुंबई

६) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय , मंत्रालय, मुंबई

७) सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदाविभाग, मुंबई

८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य -१ / २, मुंबई / नागपूर

९) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य - १ / २, मुंबई / नागपूर

१०) महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद / संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्ष , नाशिक

११) सर्व कार्यकारी संचालक , जलसंपदा विभाग

१२) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग

१३) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे

१४) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव / सह सचिव (सेवा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबः

१५) सर्व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

१६) आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

१७) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग

१८) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई / पुणें

१९) सर्व अवर सचिव / कार्यासनअधिकारी, जलसंपदाविभाग, मंत्रालय, मुंबई

२०) कार्यासन ल.पा -१.

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन -२०१६ /( ३६/२०१६ ) / दिनांक .२/४/२०१६चे सहपत्र

परिशिष्ट १

## अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाची रचना

१) अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाची रचना




२) कार्यकारी अभियंता , माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई यांचेकडील पदांची रचना



### ३) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे यांचेकडील पदांची रचना

**कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे**

- सहायक अभियंता, श्रेणी-१ (प्रशासन संगणकीकरण कक्ष -१)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (प्रशासन संगणकीकरण कक्ष -२)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (प्रशासन संगणकीकरण कक्ष -३)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (प्रशासन संगणकीकरण कक्ष -४)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (प्रशासन संगणकीकरण कक्ष -५)
- इतर अतांत्रिक पदे

### ४) कार्यकारी अभियंता बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे यांचे कडील पदांची व कामांची रचना

**कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे**

- सहायक अभियंता, श्रेणी-१ (बांधकाम व्यवस्थापन कक्ष -१)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (बांधकाम व्यवस्थापन कक्ष -२ )
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (बांधकाम व्यवस्थापन कक्ष -३)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (बांधकाम व्यवस्थापन कक्ष -४)
- सहायक अभियंता, श्रेणी-१ (बांधकाम व्यवस्थापन कक्ष -५)
- इतर अतांत्रिक पदे

५) कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे यांचे कडील पदांची रचना



परिशिष्ट २

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६ ) / दिनांक २/०४/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा साठी आवश्यक आस्थापना

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयनिहाय पद संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अधिक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई | कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई | कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे | कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे | कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे | एकुण |
| १) | अधिक्षक अभियंता | १ | ० | ० | ० | ० | १ |
| २) | कार्यकारी अभियंता | ० | १ | १ | १ | १ | ४ |
| ३) | सहा. अधिक्षक अभियंता | १ | ० | ० | ० | ० | १ |
| ४) | उप कार्यकारी अभियंता | ० | ० | १ | ० | ० | १ |
| ५) | सहा. अभियंता-१ / उप अभियंता | ० | ५ | ५ | ५ | ५ | २० |
| ६) | सहा. अभियंता-२ | ० | ५ | ५ | ५ | ५ | २० |
| ७) | विभागिय लेखापाल | ० | ० | १ | ० | ० | १ |
| ८) | अनुरेखक | ० | ० | ३ | ० | ० | ३ |
| ९) | अधीक्षक | १ | ० | ० | ० | ० | १ |
| १०) | प्रथम लिपिक | १ | ० | १ | ० | ० | २ |
| ११) | वरिष्ठ लिपिक | २ | | २ | ० | ० | ४ |
| १२) | कनिष्ठ लिपिक व टंकलेखक | २ | ३ | ७ | ० | ० | १२ |
| १३) | भांडारपाल | ० | | १ | ० | ० | १ |
| १४) | वाहनचालक | १ | १ | १ | ० | ० | ३ |
| १५) | लघु टंक लेखक | १ | | १ | ० | ० | २ |
| १६) | शिपाई | २ | २ | ५ | २ | २ | १३ |
| | एकुण = | १२ | १७ | ३४ | १३ | १३ | ८९ |

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६ ) / दिनांक २/०४/२०१६ चे सहपत्र

परिशिष्ट २ अ

(अ) कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई या कार्यालयाचे कार्यभार

१) प्रशिक्षण व परिवर्तन व्यवस्थापन संलग्न साहित्य तयार करुन घेणे याकरीता नविन तंत्रज्ञानाचा वापर करणे व याबाबत आवश्यक ती पुर्ण कार्यवाही करणे.

२) ई-प्रशासन प्रकल्प मंडळाअंतर्गत असलेल्या विविध कार्यालयाद्वारे विकसित करण्यात आलेल्या विविध प्रणालींच्या प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास्तव क्षेत्रिय कार्यालयांसोबत व प्रशिक्षण केंद्राशी समन्वय ठेवणे.

३) प्रशिक्षण कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन करणे.

४) विविध प्रणाल्यांमध्ये उपलब्ध माहितीच्या वरिष्ठ कार्यालयात वापर वाढविण्याच्या दृष्टीकोणातून माहिती संकलन व पृथ:करण करणे. (For evidence based policy making, decision support system, etc. using data analysis and business intelligence)

५) माहिती अद्ययावत अचूक व परिपूर्ण राहण्याच्या दृष्टीकोणातून आवश्यक ती कार्यवाही करणे.

६) ई-प्रशासन समन्वयकांच्या कामांचे तांत्रिक संनियंत्रण करणे व त्यांना प्रशिक्षण इ. विषयी सहाय्य करणे.

७) व्हीजन २०२० अंतर्गत व अन्य कार्यक्रमानुसार हाती घेण्यात येणाऱ्या व प्रशासनाविषयक प्रणाली संबंधी आखणी, नियोजन, विकसन, संनियंत्रण, अद्ययावतीकरण, इतर प्रणालींची जोडणी इ. बाबत कार्यवाही करणे.

(ब) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे या कार्यालयाचे कार्यभार

१) ई-जलसेवा प्रकल्पातील सहाय्यकारी मोडयूल (Support Module) चे संनियंत्रण, अद्ययावतीकरण व जोडणीबाबत कार्यवाही करणे.

२) जलसंपदा विभागाच्या अधिकृत संकेत स्थळाबाबत योग्य ते सर्व compliances, Security audit , त्याचे अद्ययावतीकरण, इतर प्रणालींशी जोडणी इ. बाबत कार्यवाही करणे.

३) ई टाईम्स प्रणालीबाबत कार्यवाही करणे.

४) ई-सेवापुस्तक या प्रणालीचे विकसन करुन त्याचे संनियंत्रण अद्ययावतीकरण व जोडणीबाबत इ. बाबत सर्व कार्यवाही करणे.

५) महामंडळाच्या लेखे ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत प्रणालीचे विकसन, संनियंत्रण, अद्ययावतीकरण व जोडणीबाबत कार्यवाही करणे.

६) सदर विभागीय कार्यालय मंडळांतर्गत असलेल्या पुणे मुख्यालय येथिल सर्व विभागीय कार्यालयांचे आस्थापना विषयक बाबींचे समन्वयक राहतील.

७) व्हीजन २०२० अंतर्गत व अन्य कार्यक्रमानुसार हाती घेण्यात येणाऱ्या व प्रशासनाविषयक प्रणाली संबंधी आखणी, नियोजन, विकसन, संनियंत्रण, अद्ययावतीकरण, इतर प्रणालींची जोडणी इ. बाबत कार्यवाही करणे.

**(क) कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे या कार्यालयाचे कार्यभार**

१) ई-जलसेवा प्रकल्पातील बांधकाम कार्यप्रकार (Module M१ to १२, २३) चे संनियंत्रण, अद्ययावतीकरण व जोडणीबाबत कार्यवाही करणे.

२) ई जलसेवा प्रणालीचे सर्व साधारण समन्वयकरित्या कामे पाहणे व कराराविषयी कार्यवाही करणे.

३) ऑनलाईन अंदाजपत्रक व कंत्राट व्यवस्थापन विषयक, e measurement book इ. विषयक नविन प्रणालीचे विकसन करुन त्याचे संनियंत्रण, अद्ययावतीकरण व जोडणीबाबत इ. बाबत सर्व कार्यवाही करणे.

४) नियोजन विभागाचे evidence base photography चे विकसनासाठी सहाय्य करणे.

५) केंद्र शासनाच्या Monitoring of state sector projects through computerized monitoring system या प्रणालीबाबत कार्यवाही करणे.

६) बांधकाम व्यवस्थापनाशी निगडित माहिती सर्व सामान्य जनतेस उपलब्ध करुन देण्याविषयक आवश्यकतेनुसार प्रणाली बाबत कार्यवाही करणे.

७) व्हीजन २०२० अंतर्गत व अन्य कार्यक्रमानुसार हाती घेण्यात येणाऱ्या व प्रशासनाविषयक प्रणाली संबंधी आखणी, नियोजन, विकसन, संनियंत्रण, अद्ययावतीकरण, इतर प्रणालींची जोडणी इ. बाबत कार्यवाही करणे.

**(ड) कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग ,पुणे या कार्यालयाचे कार्यभार**

१) ई-जलसेवा प्रकल्पातील सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकाराशी संबंधित Modules (Module M२, M१३ to M२०) चे संनियंत्रण, अद्ययावतीकरण व जोडणीबाबत कार्यवाही करणे.

२) राज्य माहिती संचयिका (State data bank) यांचेशी माहितीची जोडणी करणे.

३) मोबाईल ॲपचा वापर करुन geographic information system सह त्याबाबतचे संकेत स्थळ विकसित करण्याबाबत आवश्यक सर्व कार्यवाही करणे.

४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत आवश्यक प्रणालींच्या विकसन करुन त्या विषयक सर्व कार्यवाही करणे.

५) जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांकरीता hardware व त्याअनुषंगिक उपकरणांची खरेदी, परिचालन इ. याबत कार्यवाही करणे.

६) विभागीय स्तरावरील emailing solution व Video conferencing प्रणालीचे व्यवस्थापन करणे.

७) सिंचन व्यवस्थापनाशी निगडित इतर विभागांच्या ई-प्रणालीशी जोडणीबाबत आवश्यक कार्यवाही करणे.

८) सिंचन व्यवस्थापन व पुरनियंत्रण निगडित माहिती सर्व सामान्य जनतेस उपलब्ध करुन देण्याविषयक आवश्यकतेनुसार प्रणाली बाबत कार्यवाही करणे.

९) व्हीजन २०२० अंतर्गत व अन्य कार्यक्रमानुसार हाती घेण्यात येणाऱ्या व प्रशासनाविषयक प्रणाली संबंधी आखणी, नियोजन, विकसन, संनियंत्रण, अद्ययावतीकरण, इतर प्रणालींची जोडणी इ. बाबत कार्यवाही करणे.

51



परिशिष्ट -३(अ)

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६ ) / दिनांक २/०४/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा साठी आवश्यक आस्थापना

| अ.क्र. | पदनाम | अधिक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई | | |
|---|---|---|---|---|
| | | आकृतीबंध नुसार मंजूर करण्यात येत असलेली पदे | वर्गीकरणद्वारे पद उपलब्ध करून द्यावयाचे | |
| | | | कार्यालयचे नाव | पद संख्या |
| १) | अधिक्षक अभियंता | १ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई | १ |
| २) | सहा. अधीक्षक अभियंता | १ | | १ |
| ३) | अधीक्षक | १ | सदर पदाचे वर्गीकरणाचे आदेश स्वतंत्ररित्या काढण्यात येईल | |
| ४) | प्रथम लिपिक | १ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.४ चोंढे | १ |
| ५) | वरिष्ठ लिपिक | २ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.४ चोंढे | १ |
| | | | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई | १ |
| ६) | कनिष्ठ लिपिक व टंकलेखक | २ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई | २ |
| ७) | वाहनचालक | १ | | १ |
| ८) | लघु टंक लेखक | १ | | १ |
| ९) | शिपाई | २ | | २ |
| | एकुण = | १२ | | ११+१ |

परिशिष्ट -३(अ) (१)

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६) / दिनांक २/०४/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा साठी आवश्यक आस्थापना

| अ.क्र. | पदनाम | कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई | | |
|---|---|---|---|---|
| | | आकृतीबंध नुसार मंजूर करण्यात येत असलेली पदे | वर्गीकरणद्वारे पद उपलब्ध करून द्यावयाचे | |
| | | | कार्यालयचे नाव | पद संख्या |
| १ | कार्यकारी अभियंता | १ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष,मंत्रालय, मुंबई | १ |
| २ | सहा. अभियंता-१ / उप अभियंता | ५ | | ५ |
| ३ | सहा. अभियंता-२ | ५ | | ३ |
| | | | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.३ चोंढे | २ |
| ४ | कनिष्ठ लिपिक व टंकलेखक | ३ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष,मंत्रालय, मुंबई | १ |
| | | | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.३ चोंढे | २ |
| ५ | वाहनचालक | १ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.३ चोंढे | १ |
| ६ | शिपाई | २ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष,मंत्रालय, मुंबई | २ |
| | एकुण = | १७ | | १७ |

परिशिष्ट -३ (क)(१)

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(१३६/२०१६) / दिनांक ९/०५/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा साठी आवश्यक आस्थापना

| अ.क्र. | पदनाम | कार्यकारी अभियंता, [illegible] व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे | | |
|---|---|---|---|---|
| | | आकृतीबंध नुसार मंजूर करण्यात येत असलेली पदे | वर्गीकरणद्वारे पद उपलब्ध करून द्यावयाचे | |
| | | | कार्यालयाचे नाव | पद संख्या |
| १) | कार्यकारी अभियंता | १ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई | १ |
| २) | सहा. अभियंता -१/ उप अभियंता | ५ | पुर नियंत्रण उप विभाग क्र. ४ दौंड | १ |
| | | | पुर नियंत्रण उप विभाग क्र.२ नाशिक | १ |
| | | | लघु पाटबंधारे सर्वेक्षण (स्था.स्त) उप विभाग, देवरुख | १ |
| | | | शिल्लक दोन पदांचे वर्गीकरणाचे आदेश स्वतंत्ररित्या काढण्यात येईल | |
| ३) | सहा. अभियंता-२ | ५ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.१, पुणे | ५ |
| ४) | शिपाई | २ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.२, पुणे | २ |
| | एकुण = | १३ | | ११+२ |

परिशिष्ट -३ (ब) (२)

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६) / दिनांक २/ ०४/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा अंतर्गत विभागासाठी आवश्यक आस्थापना

| अ.क्र. | पदनाम | कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे | | |
|---|---|---|---|---|
| | | आकृतीबंध नुसार मंजूर करण्यात येत असलेली पदे | वर्गीकरणद्वारे पद उपलब्ध करून द्यावयाचे | |
| | | | कार्यालयचे नाव | पद संख्या |
| १ | कार्यकारी अभियंता | १ | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे | १ |
| २ | उप कार्यकारी अभियंता | १ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.३ चोंढे | १ |
| ३ | सहा. अभियंता-१ / उप अभियंता | ५ | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे | ५ |
| ४ | सहा. अभियंता-२ | ५ | जलविद्युत विभाग क्र.२ पुणे | ३ |
| | | | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.२, पुणे | २ |
| ५ | विभागिय लेखापाल | १ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प विभाग क्र.३ चोंढे | १ |
| ६ | अनुरेखक / आरेखक | ३ | जलविद्युत विभाग क्र.२ पुणे | ३ |
| ७ | प्रथम लिपिक | १ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.१, पुणे | १ |
| ८ | वरिष्ठ लिपिक | २ | कोयना संकल्प चित्र विभाग क्र. ४, पुणे | २ |
| ९ | कनिष्ठ लिपिक व टंकलेखक | ७ | जलविद्युत विभाग क्र.२ पुणे | ७ |
| १० | भांडारपाल | १ | सदर पदाचे वर्गीकरणाचे आदेश स्वतंत्ररित्या काढण्यात येईल | |
| ११ | वाहनचालक | १ | सदर पदाचे वर्गीकरणाचे आदेश स्वतंत्ररित्या काढण्यात येईल | |
| १२ | लघु टंक लेखक | १ | सदर पदाचे वर्गीकरणाचे आदेश स्वतंत्ररित्या काढण्यात येईल | |
| १३ | शिपाई | ५ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.२, पुणे | ५ |
| | एकुण = | ३४ | | ३१ + ३ |

परिशिष्ट -३ (ब)(३)

शासन निर्णय क्रमांक : ई -प्रशासन- २०१६/(३६/२०१६ ) / दिनांक २/ ०४/२०१६ चे सहपत्र

जलसंपदा ई-प्रशासन मंडळा अंतर्गत विभागासाठी आवश्यक असलेली पदे

| अ.क्र. | पदनाम | कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे | | |
|---|---|---|---|---|
| | | आकृतीबंध नुसार मंजूर करण्यात येत असलेली पदे | वर्गीकरणद्वारे पद उपलब्ध करून द्यावयाचे | |
| | | | कार्यालयचे नाव | पद संख्या |
| १ | कार्यकारी अभियंता | १ | प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय, मुंबई | १ |
| २ | सहा. अभियंता-१ / उप अभियंता | ५ | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प उप विभाग क्र.४ चोंढे | १ |
| | | | घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प उप विभाग क्र. १५ चोंढे | १ |
| | | | हेटवणे प्रकल्प उप विभाग क्र.७ कोलाड (ता.रोहा जि.रायगड) | १ |
| | | | हेटवणे प्रकल्प उप विभाग क्र.८ कोलाड (ता.रोहा जि.रायगड) | १ |
| | | | लघु पाटबंधारे उप विभाग, मंडणगड जि.रत्नागिरी | १ |
| ३ | सहा. अभियंता-२ | ५ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.२, पुणे | ३ |
| | | | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.१, पुणे | २ |
| ४ | शिपाई | २ | प्रकल्प संकल्प चित्र विभाग क्र.१, पुणे | २ |
| | एकुण = | १३ | | १३ |

-/- 56
संदर्भ क्र 02

जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाचे स्थलांतरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग, मंत्रालय
शासन निर्णय क्रमांक : आढावा २०१८/प्र.क्र.१४२/२०१८/आ.(प्रशि.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० ऑगस्ट, २०१८.

वाचा-

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि. ८.३.१९८४.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.१०९२/सीआर/८०६/व्यय-६, दिनांक १५.१०.१९९२.
३) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र.ई-प्रशासन-२०१६/३६/२०१६/लपा-१, दिनांक २/४/२०१६
४) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र.मेरीना-२०१६/(१७८/२०१६)/लाक्षेवि(आस्था.), दि.६.१.२०१७.
५) शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-२०१७/(१८५/२०१७/आ.(प्रशि.), दि.४.८.२०१७.

प्रस्तावना -

अ.क्र.३ येथील शासन निर्णयान्वये अधीक्षक अभियंता, प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष (मजसुप्र), मुंबई या कार्यालयाचे रुपांतरण जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई असे करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या निर्मितीपासून मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखाली मुंबई मुख्यालयी १ व पुणे मुख्यालयी ३ अशी एकूण ४ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. तसेच, अ.क्र.४ येथील शासन निर्णयान्वये महासंचालक, मेरी, नाशिक यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत कार्यकारी अभियंता, संपदा अभियांत्रिकी कक्ष, नाशिक या विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणात बदल करुन, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाच्या नियंत्रणाखाली संलग्न करण्यात आले आहे. तथापि, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ कार्यालयाचे मुख्यालय व मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखाली कार्यरत विभागीय कार्यालयांचे मुख्यालय या मधील भौगोलिक अंतरामुळे पुणे येथे कार्यरत विभागीय कार्यालयांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्यास व कार्यालयास नेमून दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत. तसेच, मंडळाधिनस्त कार्यरत संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक अंतर्गत कार्यरत तांत्रिक आस्थापना ही मेरी, नाशिक मधील वैज्ञानिक संवर्गाची असल्याने, या विभागीय कार्यालयांतर्गतच्या विविध प्रशासकीय बाबी हाताळण्यास अडचणी निर्माण होत आहेत. यासंदर्भात जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाच्या शिफारशीनुसार मंडळ कार्यालयाच्या सध्या कार्यरत मुख्यालयाच्या स्थळात व मंडळांतर्गत कार्यरत संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या कार्यालयाच्या नियंत्रणात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयाचे मुंबई येथील मुख्यालय प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पुणे येथे स्थलांतरीत करण्यास व या मंडळ कार्यालयाच्या

नियंत्रणाखाली कार्यरत कार्यकारी अभियंता, संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या कार्यालयाचे नियंत्रण महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) (मेरी), नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. मंडळ कार्यालयाचे स्थलांतरण व मंडळ कार्यालयांतर्गत कार्यरत विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणातील बदलास दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) जलसंपदा ई-प्रशासन मंडळ कार्यालयाचे मुंबई येथील मुख्यालय मंजूर पदांसह (वरिष्ठ लिपिकाचे १ पद वगळून) पुणे येथील विभागाच्या शासकीय इमारतीच्या जागेत स्थलांतरीत करण्यात यावे.

२) मंडळाच्या नियंत्रणाखाली संलग्न करण्यात आलेले कार्यकारी अभियंता, संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या विभागीय कार्यालयाचे नियंत्रण पूर्वीप्रमाणे महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) (मेरी), नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यात यावे.

३) संपदा-अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणातील बदलानंतर जलसंपदा ई-प्रशासन मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखाली (१) प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे, (२) बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे, (३) सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे व (४) माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई अशी विभागीय कार्यालयांची संरचना कार्यरत राहील.

४) मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखाली कार्यरत वरील विभागीय कार्यालयांपैकी कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई या विभागीय कार्यालयास मंडळ कार्यालयांतर्गतचे वरिष्ठ लिपिकाचे १ पद संलग्न करण्यात यावे.

५) मंडळ कार्यालयाच्या मुख्यालय स्थलांतरणामुळे मंडळाच्या कोषागार कार्यालयात बदल होत असल्याने, मंडळ कार्यालयासाठी व मंडळाच्या नियंत्रणाखाली पुणे मुख्यालयी कार्यरत विभागीय कार्यालयांसाठी मंडळ कार्यालयातील सहायक अधीक्षक अभियंता यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात यावे.

६) मुंबई मुख्यालयी कार्यरत कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई या विभागीय कार्यालयासाठी संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात यावे.

७) मंडळ कार्यालयातील सध्या कार्यरत गट-अ व गट-ब मधील अधिकाऱ्यांची नियुक्ती स्थलांतरणाने कार्यान्वित होणाऱ्या मुख्यालय ठिकाणी करण्यात यावी. तर गट-क व गट-ड या प्रवर्गातील आवश्यक कर्मचाऱ्यांची सेवा स्थानिक परिमंडळ कार्यालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावी.

८) मंडळ कार्यालयाच्या स्थलांतरणामुळे मंडळ कार्यालयांतर्गतचे मुंबई येथील गट-क व गट-ड या प्रवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांचे समावेशन कोकण परिमंडळ कार्यालयामार्फत परिमंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रिक्त जागी तात्काळ करावे.

९) स्थलांतरीत होणारे कार्यालय शासकीय जागेतच कार्यान्वित करावे. त्यासाठी बांधकामाचा वेगळा खर्च करु नये. तसेच सध्याच्या उपलब्ध साहित्याचाच वापर करण्यात यावा. प्रशासकीय व आस्थापना खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

३. वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दिनांक ८/३/१९८४ मधील तरतूदीनुसार जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे या मंडळ व नियंत्रणाखालील कार्यरत विभागीय कार्यालयांचे नियंत्रक अधिकारी हे मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता राहतील. तर संपदा अभियांत्रिकी केंद्र, नाशिक या विभागीय कार्यालयाचे नियंत्रक अधिकारी अधीक्षक अभियंता, मेरी, नाशिक व सदर विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

४. स्थलांतरीत / वर्ग होणारे मंडळ कार्यालय मुख्य अभियंता (जलसंपदा), जलसंपदा विभाग, पुणे या प्रादेशिक विभागांतर्गतच्या नियंत्रणाखाली दिनांक १ सप्टेंबर, २०१८ पासून कार्यान्वित होतील या दृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही मंडळ कार्यालयाने करावी.

५. हा शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२ मधील तरतूदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतर वित्त सल्लागार व उपसचिव यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०८२०१२५७२४३४२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्य पाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil
Gangaram
Gangarkar

(सुनिल गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा.
७. मा. विधान परिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.

१३. महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर.
१४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक.
१६. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा (DTHRS) मेरी, नाशिक.
१७. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
१८. सह सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे.
२१. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
२२. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२३. आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. उप सचिव (सेवा) / उप सचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, मुंबई.
२६. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
२७. कार्यकारी अभियंता,संपदा अभियांत्रिकी, केंद्र, नाशिक.
२८. कार्यकारी अभियंता, माहिती व्यवस्थापन व प्रशिक्षण विभाग, मुंबई.
२९. कार्यकारी अभियंता, बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे.
३०. कार्यकारी अभियंता, सिंचन व्यवस्थापन संगणकीकरण विभाग, पुणे.
३१. कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(मंडळ कार्यालयाच्या मुख्यालय व विभागीय कार्यालयाच्या नियंत्रणात होणाऱ्या बदलांची नोंद घेण्यास्तव अग्रेषित)
३२. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३. आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ / निवड नस्ती.

परिशिष्ट क्र.०३

60 49

अधिक्षक अभियंता, ई- प्रशासन मंडळ, पुणे या कार्यालयाच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणात बदल करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : आढावा-२०२३/प्र.क्र.४/आ( पुर्नरचना)
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग ,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २१ जुलै, २०२३.

वाचा :-१) जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक : ई-प्रशासन-२०१६/३६/२०१६/लपा-१, दि. ०२.०४.२०१६.

२) जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्र : आढावा-२०१८/प्र.क्र.१४२/२०१८/आ.(प्रशि), दि.२०.०८.२०१८.

३) जलसंपदा विभाग,शासन शुध्दीपत्रक,क्र : आढावा-२०१८/प्र.क्र.१४२/२०१८/आ.(प्रशि), दि.०४.०९.२०१८.

प्रस्तावना :-

शासनाच्या ई-प्रशासन धोरणाच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन जलसंपदा विभागाच्या विविध कार्यप्रकारात अधिकाधिक कार्यक्षमता आणण्याच्या दृष्टीने तसेच नवनवीन ई-प्रशासन प्रकल्प सुलमतेने राबविण्याकरीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि.०२.०४.२०१६ अन्वये अधीक्षक अभियंता, प्रकल्प तयारी व व्यवस्थापन कक्ष (मजसुप्र), मंत्रालय, मुंबई या मंडळ कार्यालयाचे रुपांतरण अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई - प्रशासन मंडळ, मुंबई या कार्यालयामध्ये करण्यात आले आहे.

२. जलसंपदा ई - प्रशासन मंडळ कार्यालयाचे मुख्यालय व मंडळ कार्यालयाच्या नियंत्रणाखाली कार्यरत विभागीय कार्यालयांच्या मुख्यालयातील भौगोलिक अंतरामुळे पुणे येथे कार्यरत विभागीय कार्यालयांच्या कामकाजावर संनियत्रण ठेवण्यास व कार्यालयास नेमून दिलेली उदिष्टे पूर्ण करण्यात अडचणी निर्माण झाल्याने प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय दि.२०.०८.२०१८ अन्वये जलसंपदा ई-प्रशासन मंडळ कार्यालयाचे मुख्यालय मुख्य अभियंता (जलसंपदा) जलसंपदा विभाग, पुणे यांच्या नियंत्रणाखाली पुणे येथे स्थलांतरीत करण्यात आले होते. त्यानंतर संदर्भ क्र.३ येथील शासन शुध्दीपत्रक दि.०४.०९.२०१८ अन्वये ई- प्रशासन मंडळ या मंडळ कार्यालयाचे नियंत्रण मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प), जलसंपदा विभाग, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आले.

३. मुख्य अभियंता ( विप्र ), जलसंपदा विभाग, पुणे हे पुणे जिल्हातील सिंचन प्रकल्पांसाठी कार्यरत असलेले क्षेत्रिय प्रादेशिक कार्यालय असून सदर कार्यालयाच्या कामकाजाची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. त्यामुळे या कार्यालयाला ई प्रशासन मंडळाच्या कामकाजाला परिणामकारक पध्दतीने वेळ देण्यास मर्यादा येत आहेत. तसेच त्यांचे कार्यक्षेत्र हे पुणे प्रदेशापुरते मर्यादित असल्याने राज्यातील इतर पाटबंधारे विकास महामंडळ अथवा क्षेत्रीय कार्यालयांशी संपर्क साधताना अडचणी निर्माण होत आहेत. यास्तव ई प्रशासन मंडळ कार्यालयाच्या उद्दिष्टांचे प्रभावी नियोजन व संनियंत्रण करुन प्रणालींचे विकसन व परिणामकारक अंमलबजावणी करता यावी, याकरीता सदर मंडळ कार्यालयाच्या प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रणात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

अधिक्षक अभियंता,जलसंपदा ई-प्रशासन मंडळ,पुणे या कार्यालयाचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प), जलसंपदा विभाग, पुणे यांचेऐवजी मुख्य अभियंता (स्थापत्य) , जलविदयुत प्रकल्प व गुणनियंत्रण पुणे यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

२. संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय, दि.०२.४.२०१६ मधील परि.क्र.३ व ४ तसेच सुधारित आकृतीबंधास मान्यता मिळेपर्यंत परि.क्र.७, ८ व संदर्भ क्र. २ व ३ येथील शासन निर्णयातील परि.क्र.२ मधील लागू असलेल्या तरतूदी कायम राहतील.

३. वरील प्रमाणे होणाऱ्या नियंत्रणातील बदल हे सदर आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील. यादृष्टीने मुख्य अभियंता ( स्थापत्य ), जलविदयुत प्रकल्प व गुणनियंत्रण पुणे यांनी आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी. तसेच या मंडळ कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व इतर भत्ते ही प्रचलित कार्यपध्दतीनुसार अदा करण्यात यावे.

४. जलसंपदा ई- प्रशासन विषयक मंत्रालय स्तरावरील कामे उप सचिव तथा अधीक्षक अभियंता (निवस) हे पाहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०७२११५५४३२५१२७ हा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

UDDHAV R DAHIPHALE

( उध्दव दहिफळे )
उप सचिव, जलसंपदा विभाग.

प्रत,

१) म.उपमुख्यमंत्री ( जलसंपदा ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव ( जलसंपदा ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव ( जसंवि व लाक्षेवि ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव ( प्रकल्प समन्वय ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल१/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६) महालेखापाल१/२ ( लेखा परिक्षा ), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (मेरी) नाशिक
९) सर्व कार्यकारी संचालक, जलसंपद विभाग.
१०) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) आंतर वित्तीय सल्लागार व सह/उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सह सचिव (सेवा)/उप सचिव (आस्था)/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक.
१४) सर्व मुख्य अभियंता/ अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.

१५) कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे.
(कार्यालयात झालेल्या बदलाची नोंद घेण्यास्तव अग्रेषित)
१६) कार्यासन आस्थापना ( पुनर्रचना ) निवडनस्ती.

63

महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग
मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण,
सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे- ४११०११.
दूरध्वनी क्र. (०२०)२६१२१८४४
ई मेल - cehpqc.punewrd@gmail.com

जा.क्र.मुअ (स्था)/जविप्र व गुनि/आ-१/ ९६८० / सन २०२३ दिनांक:- २७/१०/२०२३.

प्रति,

मा.अतिरीक्त मुख्य सचिव
जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मुंबई

(लक्षवेध- श्रीमती राखी चव्हाण, अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

विषय :- पदोन्नतीने जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे अधीक्षक अभियंता या पदे पदस्थापना मिळणेबाबत.

संदर्भ:- श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहा.मुख्य अभियंता यांचा दि.२६/१०/२०२३ रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषयास अनुसरुन या प्रदेश कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहा.मुख्य अभियंता यांचा पदोन्नतीनंतर जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे येथील अधीक्षक अभियंता या पदी पदास्थापना मिळणेबाबतचा विनंती अर्ज सदर्भान्वये प्राप्त झालेला आहे.

श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्यां दि.१९/०९/२०१६ पासून अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे या विभागीय कार्यालयाचा कार्यभार सांभळलेला असल्याचे त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले आहे. तदनंतर त्यांची बदली मा.मुख्य अभियंता (स्था) जल विद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे या प्रदेश कार्यालयामध्ये झाली असून त्यानी सदर कार्यालयातील सहाय्यक मुख्य अभियंता (स्था) या पदाचा कार्यभार दि.११/०८/२०२० म.नं. पासून आज अखेरपर्यंत संभाळत असल्याचे देखील नमुद केलेले आहे.

संदर्भिय अर्जात श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहा.मुख्य अभियंता यांना यापूर्वी ई-प्रशासन मंडळ, पुणे येथील खालील प्रमाणे कामाचा अनुभव असल्याचे देखील त्यांनी त्यांचा अर्जात नमूद केलेला आहे.

१. E-Service Book, e-TIMES, Account Management System (AMS) व जलसंपदा विभागाचे नविन संकेतस्थळ या ई प्रणालींचे विकसित करणे.
२. IFMS संमिती व उपसमितीबाबत कामकाज.
३. IDC META व MERI यांची स्वतंत्र संकेतस्थळे विकसित करण्यास्तव प्रशासकीय मान्यता.
४. IDC, META व MERI यांची स्वतंत्र संकेतस्थळे विकसित करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबवणे व प्रकल्प विकसित करणे.
५. IFMS प्रणाली विकसित करणे व त्याची महामंडळामध्ये अंमलबजावणी करणे.
६. जलसंपदा विभागाशी निगडीत सर्व शासन निर्णयांचे Compilation व त्यांसंबंधीत प्रणाली विकसित करणे.

त्यानुसार श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहा.मुख्य अभियंता यांनी ई-प्रशासन प्रकल्पात काम करण्याची आवड असून त्या सदर कार्यालयात काम करण्यास इच्छुक आहेत. जर त्यांची अधीक्षक अभियंता या पदावर पदोन्नती झाल्यावर त्यांनी अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे येथील

अधीक्षक अभियंता या पदावर पदस्थापना होणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहा.मुख्य अभियंता यांना अधीक्षक अभियंता या पदी पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांची पदस्थापना या प्रदेश कार्यालांतर्गत अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे येथील अधीक्षक अभियंता या पदी होणेबाबत शासनास शिफारस करण्यात येत आहे.

हे आपले माहितीस्तव सविनय सादर.

Chopade
(सं.द.चोपडे)
मुख्य अभियंता (स्था.)
जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण,
पुणे-११

सोबत- श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहा.मुख्य अभियंता यांचा विनंती अर्ज

65

श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड
सहाय्यक —— अभियंता
जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण पुणे
दि. २६/१०/२०२३

प्रति,

मा.अतिरीक्त मुख्य सचिव
जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मुंबई

योग्य त्या मार्गाने सविनय सादर.
(लक्षवेध- श्रीमती राखी चव्हाण, अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

विषय- पदोन्नतीने जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे —— अधीक्षक अभियंता या पदी पदस्थापना मिळणेबाबत.

मा.महोदय,

मी दि.१९/०९/२०१६ रोजी म.पु पासून पदोन्नतीने कार्यकारी अभियंता या पदावर अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे येथे हजर झाले. तद्नंतर मा.मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे या प्रदेश कार्यालयामध्ये सहाय्यक मुख्य अभियंता (स्था) या पदी बदलीने दि.११/०८/२०२० म.नं. पासून आजअखेरपर्यंत कार्यरत आहे.

सध्यस्थितीमध्ये शासन स्तरावरुन कार्यकारी अभियंता यांना अधीक्षक अभियंता पदी पदोन्नतीच्या विचारक्षेत्रामध्ये माझे नाव आहे.

जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे अंतर्गत मी दिनांक १९ सप्टेंबर २०१६ ते दिनांक १० ऑगस्ट २०२० या कालावधीत कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग पुणे या पदी कार्यरत असताना खालील नमुद कामे केलेली आहेत.

१) E-Service Book, e-TIMES, Account Management System (AMS) व जलसंपदा विभागाचे नविन संकेतस्थळ या ई प्रणालींचे विकसित करणे.
२) IFMS समिती व उपसमितीबाबत कामकाज.
३) IDC META व MERI यांची स्वतंत्र संकेतस्थळे विकसित करण्यास्तव प्रशासकीय मान्यता.
४) IDC, META व MERI यांची स्वतंत्र संकेतस्थळे विकसित करण्याबाबत निविदा प्रक्रिया राबवणे व प्रकल्प विकसित करणे.
५) IFMS प्रणाली विकसित करणे व —— महामंडळामध्ये अंमलबजावणी करणे.
६) जलसंपदा विभागाशी निगडीत सर्व शासन निर्णयांचे Compilation व त्यासंबंधीत प्रणाली विकसित करणे.

तरी माझ्या सदर अनुभवानुसार ई-प्रशासन प्रकल्पात मला काम करण्याची आवड असून मी काम करण्यास इच्छुक आहे.

तरी माझ्या विनंती अर्जाचा सहनुभुतपूर्वक विचार करुन माझी अधीक्षक अभियंता पदी पदोन्नतीने पदस्थापना मा.मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे अंतर्गत अधीक्षक अभियंता, जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे येथे व्हावी, ही नम्र विनंती.

आपली विश्वासु

(श्रीमती श्र.सा.सुदेवाड)
सहाय्यक मुख्य अभियंता

प्रत- मा.मुख्य अभियंता (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन,<br>जलसंपदा विभाग | |
| दूरध्वनी क्र. (०२०)२६१२१८४४<br>ई मेल - cehpqc.punewrd@gmail.com | मुख्य अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण,<br>सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे- ४११०११. | |
| जा.क्र.मुअ (स्था)/जविप्र व गुनि/आ-१/ १६६९ / सन २०२३ | | दिनांक:-२६ /१०/२०२३. |

# प्रमाणपत्र

विषय:- ई-प्रशासन अंतर्गत सेवा कार्यकारी / अकार्यकारी प्रकारात गणनेबाबत

संदर्भ:- श्रीमती. श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहाय्यक मुख्य अभियंता यांचा दि.१४ जुन, २०२३ रोजीचा विनंती अर्ज.

जलसंपदा विभागाचे प्रशासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी राज्याचे ई-प्रशासन धोरण स्विकारले असून जलसंपदा विभागासाठी ई प्रशासन प्रकल्प विकसित करणेसाठी जलसंपदा ई-प्रशासन मंडळ ची निर्मिती २ एप्रिल २०१६ रोजी केली आहे.

ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याचे प्रक्रियेत प्रकल्प अहवाल तयार करणे, सक्षम स्तरावर प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा प्रकिया राबविणे, निविदा मूल्यांकन करणे, अभिकरणाकडून प्रकल्प विकसित करून घेणे , प्रकल्प राज्यमरातील जलसंपदा विभागाचे कार्यालयासाठी उपलब्ध करून देणे, ई-प्रशासन प्रकल्पाबाबत प्रशिक्षण देणे, राज्यस्तरीय समिती चे कामकाज इ बार्बीचा अंतर्भाव होतो.

ई-प्रशासन येथे विशेष प्रकारचे व जलसंपदा विभागाचे नियमित कामकाजा पेक्षा वेगळया पध्दतीचे कामकाज स्वरुप असलेले तांत्रिक अधिकारी तसेच कर्मचारी यांनी ई-प्रशासन मंडळ अंतर्गत सेवा देणेसाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

ई-प्रशासन प्रकल्प राबविताना कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही कार्यप्रकारची कामे अधिकारी यांना करणे आवश्यक आहे सबब ई प्रशासन मंडळ अंतर्गत केलेला सेवा कालावधी हा आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणणे उचित आहे.

प्रमाणित करणेत येते , श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहाय्यक मुख्य अभियंता हे जलसंपदा ई-प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे येथे दि.१९/०९/२०१६ ते दि.१०/०९/२०२० या कालावधीत कार्यरत होत्या.

Chopade

(सं.द.चोपडे),

अभियंता (स्था.),

जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण,

पुणे- ४११०११

प्रत:- मा. अति. मुख्य सचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

(लक्षेवध -श्रीमती राखी चव्हाण, अवर सचिव (आस्था १), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन)

प्रत:- श्रीमती. श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांना माहितीसाठी रवाना.

67

संदर्भ क्र. ५

| स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन<br>जलसंपदा विभाग | |
|---|---|---|
| दुरध्वनी क्र. (०२०)२६१२१८४४<br>ई-मेल- cehpqc.punewrd@gmail.com | मुख्य अभियंता (स्थापत्य) जलविद्युत प्रकल्प व नियंत्रण, पुणे<br>सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११ | दिनांक २९/०५/२०२४ |

जा.क्र.मुअ (स्था)/जविप्र व गुनि/आ-१/६५३/सन २०२४

प्रति,

मा.अपर मुख्य सचिव,
जलसंपदा विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई - ३२

(लक्षवेध - श्रीमती राखी चव्हाण, अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

95
2८/5/2024

| | |
|---|---|
| विषय :- | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीबाबत अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीबाबत<br>श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता |
| संदर्भ :- | १) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक ०९/०२/२०२४<br>२) मु.अ (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे या कार्यालयाचे पत्र क्र. मु.अ (स्था)/ जविप्र व गुनि/ आ-१/२१२/ सन २०२४ दि.१२/०२/२०२४<br>३) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक ११/०३/२०२४<br>४) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक २८/०५/२०२४.<br>५) श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांचा दि.२८/०५/२०२४ रोजीचा विनंती अर्ज. |

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, या खुद्द प्रदेश कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांचा विषयांकीत प्रकरणी मा.अपर मुख्य सचिव,जलसंपदा विभाग,महाराष्ट्र शासन यांना उद्देशुन केलेला विनंती अर्ज संदर्भ क्र ५ अन्वये या प्रदेश कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर विनंती अर्जामध्ये श्रीमती सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांनी नमुद केल्याप्रमाणे त्यांचे सन २०२३-२४ च्या निवडसुचीमधून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरुन अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीकरीता विचारक्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या यादीत नाव असून सदर अधिकाऱ्यांची माहिती संदर्भ क्र.१ अन्वये मागविण्यात आली होती. त्यानुसार त्यांची माहिती या प्रदेश कार्यालयाचे संदर्भ क्र २ अन्वये शासनास या पुर्वीच सादर केले आहे.

परंतु आता संदर्भ क्र.४ च्या शासन पत्रान्वये अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीकरीता महसूल विभागासाठी पसंतीक्रम विचारण्यात आलेल्या यादीत श्रीमती सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांच्या नावाचा समावेश नसल्यानेबाबतचा विनंती अर्ज या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

E:\Ardhai 02-01-2023\सर्वसाधारण पत्रे 01-01-2023\2.doc

६८

हे आपल्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.

*( मुळप्रत मु.अ. यांना मान्य असो)*

सोबत- १) श्रीमती सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांचा विनंती अर्ज

(म.प्र.माने)
विशेष अधीक्षक
जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण
सिंचन भवन, पुणे ४११०११

प्रत- श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, सहाय्यक मुख्य अभियंता यांना प्रवेश कार्यालयामार्फत माहितीसाठी.

/59

श्रद्धा सा. मुदेवाड
सहाय्यक मुख्य अभियंता
जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे
दि.२८/०५/२०२४

प्रति,
मा. अपर मुख्य सचिव,
जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मुंबई.

(लक्षवेध: श्री उद्धव दहिफळे - शासनाचे उप सचिव )

**विषय : अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीबाबत**

संदर्भ: १) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक ०९.०२.२०२४

२) मु.अ (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे या कार्यालयाचे पत्र क्र. मु.अ (स्था)/ जविप्र व गुनि/ आ- १/ १६७०/ सन २०२३

३) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक ११.०३.२०२४

४) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.एसएलएस- १२२४/ प्र. क्र.५५/२०२४/आ (वर्ग-१), दिनांक २८.०५..२०२४

[illegible]

[illegible] २०२३-२४ च्या निवडसूचीमधून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरून अधीक्षक अभियंता [illegible] पदोन्नतीकरीता विचारक्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या यादीत माझे नाव असून सदर अधिकाऱ्यांची [illegible] अन्वये मागविण्यात आली होती व मी संदर्भ क्र.२ अन्वये माझी माहिती शासनास सादर केली [illegible]

संदर्भ क्र.२ अन्वये प्राप्त माहितीच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये काही अधिकाऱ्यांच्या [illegible] त्रुटिबाबत कळविले होते परंतु या पत्रात माझ्या नावाचा समावेश नव्हता व या संदर्भात कुठलाही पत्रव्यवहार माझ्याशी झालेला नाही. परंतु आता संदर्भ क्र.४ च्या शासनपत्रान्वये अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीकरीता महसूल विभागासाठी पसंतीक्रम विचारण्यात आलेल्या यादीत माझा नावाचा समावेश नसून शासनाने प्रसिद्ध केलेल्या कार्यकारी अभियंताच्या ज्येष्ठता यादीतील माझा पेक्षा कनिष्ठतम अधिकाऱ्यांचा समावेश केला आहे.

तरी सदर बाबींची शहानिशा व्हावी व माझ्या नावाचा समावेश श्रीमती योजना पुनसे यांच्या नावाखाली यादीतील अनु क्र. २३ वर करून सुधारित पत्र निर्गमित व्हावे, ही नम्र विनंती.

आपली विश्वासू,

श्रद्धा सा. मुदेवाड
सहाय्यक मुख्य अभियंता

प्रत: मा. मु.अ (स्था) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहिस्तव सविनय सादर.

70
सदर्भ क्र.०६
65

**गोपनीय/कालमर्यादा**

जा.क्र.कोसांमं/पशा/आले-१/ 233/ दिनांक - ०१/५/२०१४

प्रति,

मा.प्रधान सचिव (जसवि व लाक्षेवि),
जलसंपदा विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

(लक्षवेध - डॉ.माधव वीर, शासनाचे अवर सचिव)

विषय - अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नती देण्याकरिता कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील अधिका-यांची माहिती तातडीने उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ - शासन, जलसंपदा वि.,मुंबईकडील गो.प.क्र.एसएलएस-१२१३/प्र.क्र.४०६/ आ (वर्ग-२) दि.२.५.२०१४.

संदर्भिय गोपनीय पत्राचे अनुषंगाने, या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या श्रीमती पू.दे.देसाई, कार्यकारी अभियंता यांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

१. कार्यकारी पदावरील सेवेचा तपशील - दि.१३.८.२०१२ ते आजतागायत. (सेवातपशील सोबत सादर)

अकार्यकारी पदावरील सेवेचा तपशील - दि.१२.२.१९९६ ते १२.८.२०१२ (सेवातपशील सोबत सादर)

(दि.१३.८.२०१२ ते १५.११.२०१२ = ९५ दिवस सक्तिचा प्रतिक्षा कालावधी)

२. श्रीमती देसाई, कार्य. अभियंता या खुल्या प्रवर्गातील असल्याने जात वैधता प्रमाणपत्राचा प्रश्न उदभवत नाही.

३. श्रीमती देसाई, कार्य. अभियंता यांचे मूळ सेवापु.तक सोबत पाठविण्यांत येत आहे.

कृ.मा.प.

४ श्रीमती देसाई, कार्य अभियंता यांचे सन २०१३-१४ चे गोपनीय अहवालाची पूर्तता करून ते शासनाला सादर करणेसाठी या कार्यालयाचे गो.प.क्र.अधीक्षक/२९(अ) दिनांक २४.४.२०१४ अन्वये मा.मुख्य अभियंता (स्था), जलविद्युत प्रकल्प, पुणे यांना सादर करण्यांत आलेले आहेत.

५. श्रीमती देसाई, कार्य. अभियंता ह्या बदलीने या मंडळांतर्गत दि.१६.११.२०१२ म.पू. रोजी रूजू झालेल्या आहेत. (तथापि दि.१३.८.२०१२ पासून या मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता पदावरील कामकाज हाताळले) त्या कालावधीपासून आजपर्यन्त त्यांचेविरूध्द विभागीय चौकशीबाबत कांहीही पत्रव्यवहार या कार्यालयात नाही.

६. श्रीमती देसाई, कार्य. अभियंता यांचा अद्ययावत सेवा तपशील सोबत सादर करण्यांत आलेला आहे.

सहपत्र- श्रीमती देसाई, कार्य.अ. यांचे मूळ सेवापुस्तक व सेवातपशील

अधीक्षक अभियंता,
कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे-३८.

(सेवातपशील)

| | |
|---|---|
| १) अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव | श्रीमती पूर्णिमा देवांग देसाई |
| २) जन्मदिनांक | दि १०/१०/१९७२ |
| ३) शैक्षणिक अर्हता | बी.ई (स्थापत्य) |
| ४) स्वग्राम पत्ता | डी-६०४, आनंद गार्डन्स, आनंद पार्क, नवा लिंक रोड, कंधारपाडा, दहीसर(प)मुंबई-६८ |
| ५) निवासी जिल्हा | पुणे |
| ६) मागासवर्गीय आहात काय? असल्यास जातीचे नांव व प्रवर्ग (अ.जा./अ.ज./वि.जा.(अ)/भ.ज.(ब)(क)(ड)/वि.मा.प्र./इ.मा.व.) | नाही. |
| ७) शासकीय सेवेत प्रवेश केल्याचा दिनांक | दि.१२/२/१९९६<br>सहा.कार्य.अभियंता |
| ८) उप अभियंता व तत्सम पदावरील नियुक्तीचा प्रकार (स.का.अ./स.अ.श्रे-१/उ.वि.अभि./उ.वि.अधि./) | सहा.कार्य.अभियंता |
| ९) स.का.अ./स.अ.श्रे-१/उ.वि.अभि./उ.वि.अधि.पदावरील नियुक्तीचा दिनांक व पद | दि.१/०७/२०००<br>सहा.कार्य.अभियंता |
| १०) कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीचा दिनांक | दि.३१/०७/२००४ |
| ११) शासकीय सेवेत असताना पूर्ण केलेल्या प्रशिक्षण/परिषदा इ.चा तपशील. | स्वतंत्र तक्ता सोबत जोडला आहे. |
| १२) शासकीय सेवेत प्रवेश केल्यापासून आतापर्यन्त धारण केलेल्या पदांबाबत तपशील. | स्वतंत्र तक्ता सोबत जोडला आहे. |

73

**शासकीय सेवेत असताना पूर्ण केलेल्या प्रशिक्षण/ परिषदा इ.चा तपशील.**
**(श्रीमती पु.दे.देसाई, कार्यकारी अभियंता, ई-प्रशासन प्रकल्प व्यव.कार्यालय, पुणे)**
**मुद्दा क्र.११ ची माहिती**

| अ.क्र | कालावधी | प्रशिक्षण संस्थेचे नांव | प्रशिक्षणाचा विषय |
|---|---|---|---|
| १ | दि.१.७.२००० ते ३०.६.२००१ | महा.अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,नाशिक. | सरळसेवा प्रविष्ट अधिका-याचे Induction Orientation प्रशिक्षण |
| २ | ३ दिवस | मुंबई | Procurement for World Bank Aided Projects |
| ३ | ५ दिवस | राष्ट्रीय जल अकादमी, पुणे | Application of ICT in Water Resources. |
| ४ | १ वर्ष | I.I.M., Indor | Certificate Programme in e-Governance. |

मुद्दा क्र.१२ बाबतची माहिती

शासकीय सेवेत प्रवेश केल्यापासून आतापर्यन्त धारण केलेल्या पदांबाबत तपशील.

(श्रीमती पु.दे.देसाई, कार्यकारी अभियंता, ई-प्रशासन प्रकल्प व्यव.कार्यालय, पुणे

| अ.क्र | कालावधी पासून/पर्यन्त | धारण केलेले पद | कार्यालयाचे नांव व पत्ता | कार्यप्रकार (कार्यकारी/अकार्यकारी) |
|---|---|---|---|---|
| १ | दि.१२.२.१९९६ ते ३०.६.२००० | सहा.अभि.श्रेणी-२ | नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर | कार्यालयीन तांत्रिक कामकाज (अकार्यकारी) |
| २ | दि.१.७.२००० ते ३०.६.२००१ | सहा.कार्य.अभियंता | महाराष्ट्र अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक. | सरळसेवा प्रविष्ट अधिकाऱ्यांचे Orientation प्रशिक्षण (अकार्यकारी) |
| ३ | दि.१.७.२००१ | पदग्रहण कालावधी | | |
| ४. | दि.२.७.२००१ ते १६.८.२००४ | सहा.कार्य.अभियंता | पाटबंधारे विभाग, मंत्रालय, मुंबई | कार्यालयीन तांत्रिक कामकाज(अकार्यकारी) |
| ५. | दि.१७.८.२००४ ते १४.९.२०११ | कार्यकारी अभियंता | संनियंत्रण कक्ष, मंत्रालय, मुंबई | कार्यालयीन तांत्रिक कामकाज(अकार्यकारी) |
| ६ | दि.१५.९.२०११ ते १०.८.२०१२ | अध्ययन रजा | | |
| ७. | दि.११.८.२०१२ ते १२.८.२०१२ | कार्यकारी अभियंता | संनियंत्रण कक्ष, मंत्रालय, मुंबई | कार्यालयीन तांत्रिक कामकाज |
| ६. | दि.१३.८.२०१२ ते १५.११.२०१२ | ९५ दिवस सक्तीचा प्रतिक्षा कालावधीचे दरम्यान कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत कार्यकारी अभियंता या पदावरील कामकाज हाताळले.(कार्यकारी) | | |
| ७. | दि.१६.११.२०१२ ते आजतागायत | कार्यकारी अभियंता | ई-प्रशासन प्रकल्प व्यव. कार्यालय, पुणे (कोयना संकल्पचित्र मंडळांतर्गत) | ई-जलसेवा प्रकल्पांचे प्रकल्प व्यवस्थापन व अंमलबजावणीचे काम पहाणे.(कार्यकारी) |

75

संदर्भ क्र. ०७

जलसेवा

जलसंपदा विभाग

दुरध्वनी: ०२०- २५४४०३१५

ई-मेल:sewregc.wrd@maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता,

जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे.

जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळापाजवळ, कोथरुड, पुणे- ४११०३८.

जा.क्र.जईप्रमंपुणे/आस्था-१/६३४/२०२१ दि. १९/०५/२०२१

## प्रमाणपत्र

विषय :- ई प्रशासन अंतर्गत सेवा कार्यकारी/अकार्यकारी प्रकारात गणनेबाबत.

संदर्भ :- श्री. अ. गो. काटकर यांचा विनंती अर्ज दि १०/०५/२०२१.

जलसंपदा विभागाने प्रशासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठं राज्याचे ई प्रशासन धोरण स्वीकारले असून जलसंपदा विभागासाठी ई प्रशासन प्रकल्प विकसित करणेसाठी जलसंपदा ई प्रशासन मंडळ ची निर्मिती २ एप्रिल २०१६ रोजी केली आहे.

ई- प्रशासन प्रकल्प राबविण्याच प्रक्रियेत प्रकल्प अहवाल तयार करणे, सक्षम स्तरावर प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा प्रक्रिया राबविणे, निविदा मूल्यांकन करणे, अभिकरणाकडून प्रकल्प विकसित करून घेणे,प्रकल्प राज्यभरातील जलसंपदा विभागाचे कार्यालयासाठी उपलब्ध करून देणे, ई प्रशासन प्रव त्याबाबत प्रशिक्षण देणे, राज्यस्तरीय समिती चे कामकाज इ बाबींचा अंतर्भाव होतो.

ई प्रशासन येथे विशेष प्रकारच व जलसंपदा विभागाचे नियमित कामकाज पेक्षा वेगळ्या पद्धतीचे कामकाज स्वरूप असलेले तांत्रिक अधिकारी तसेच कर्मचारी यांनी ई प्रशासन मंडळ अंतर्गत सेवा देण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

ई प्रशासन प्रकल्प राबवितांना कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही कार्यप्रकार ची कामे अधिकारी यांना करणे आवश्यक आहे सबब ई प्रशासन मंडळ अंतर्गत केलेला सेवा कालावधी हा आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणणे उचित आहे

प्रमाणित करणेत येते की श्री अभय गोविंद काटकर हे जलसंपदा ई प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग पुणे येथे दि १/०८/२०१६ ते २८/११/२०१७ या कालावधीत कार्यरत होते.

(प्र.शे.नार्वेकर)
अधीक्षक अभियंता,
जलसंपदा ई प्रशासन मंडळ,
कोथरूड पुणे.

प्रत - मा.प्रधान सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(लक्षवेध : श्री.सु.ग.गांगरकर, अवर सचिव आस्थापना जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई )

प्रत - मा मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - श्री अभय गो.काटकर,कार्यकारी अभियंता यांना माहितीस्तव .

"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -2015"
महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
Web: www.wrd.maharashtra.gov.in

क्र. संकीर्ण २०१५/(२१२/१५)/लपा-१

जलसंपदा विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:-१२/१०/२०१५

प्रति,
अधीक्षक अभियंता
कोयना संकल्पचित्र मंडळ,
पुणे

| | |
|---|---|
| विषय:- | जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत |
| संदर्भ:- | १) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-०४१२ / (१८९/२०१२) / (भाग-१) / मोप्र-१ दि.९/८/२०१२<br>२) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. ई-प्रशासन२०१३ / (२७ / १३) / लपा-१, दि.१२/०३/२०१३<br>३) दि. १७/०६/२०१५ रोजी मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय —— घेतलेल्या आढावा सभेदरम्यान दिलेले निर्देश<br>४) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. पी.एम.ओ./D-४/धा-१२७/११९८/२०१५ दिनांक:-३०/०६/२०१५ |

1) संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये जलसंपदा विभागाच्या ई-प्रशासन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाची (PMO) स्थापना करण्यात आली आहे.
2) संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये रु. दहा लक्ष पेक्षा जास्त व रु. पाच कोटीपेक्षा कमी किंमतीच्या ई-प्रशासन प्रकल्पांस मान्यता देण्याकरिता जलसंपदा विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना अशा समितीची मान्यता घेण्यात येते.
3) जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्थापत्य विषयक कामांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन सदर प्रकल्पांचे काम पुर्ण करण्यात — सद्यस्थितीत ई-प्रशासन विषयक कामांच्या बाबतीत देखील महाराष्ट्र बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, योग्य असेल त्यानुसार वेळोवेळी काम करण्यात आले आहे. तथापि, सदर आदेश हे स्थापत्य विषयक कामांशी संबंधित असल्याने ई-प्रशासन विषयक प्रकल्पांच्या बाबतीत कामाच्या स्वरुपाशी सुसंगत असे आदेश निर्गमित करावेत याबाबत संदर्भ क्र. ३ मध्ये नमुद बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली होती. याअनुषंगाने मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी याबाबत आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करावा, निर्देश दिले —
4) संदर्भ क्र. ४ अन्वये कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांनी ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दतीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. या कार्यपध्दतीमध्ये खालील बाबींचा समावेश असुन, सविस्तर कार्यपध्दत सोबत मंजुर करुन जोडण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| १. | ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करणे |
| २. | विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee) |
| ३. | प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे |
| ४. | प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे |
| ५. | यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे |
| ६. | केलेल्या कामाची देयके देणे |
| ७. | Change Request मंजुर करणे |
| ८. | सुधारीत प्रशासकीय मान्यता |
| ९. | पुर्णत्व अहवाल |
| १०. | प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण |

5) सदर तरतुदी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत यानंतर हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांना लागु राहतील. जे प्रकल्प सद्यस्थितीत विकसनाच्या टप्प्यावर आहे व ज्यांना या कार्यपध्दतीमधील अ.क्र. (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता मिळालेली आहे, त्यांना अ.क्र. (४) नुसार तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही. अशा प्रकल्पांच्या बाबतीत अ.क्र. (२) अन्वये प्रदान केलेली मान्यता [illegible] तांत्रिक मान्यता समजण्यात यावी. तथापि, अशा प्रकल्पांना अ.क्र. (३) नुसार नमुद केलेली प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच [illegible] कार्यपध्दतीमधील अ.क्र. (६) ते (१०) या तरतुदी देखील आवश्यक त्या फेरफारांसह लागु राहतील.

6) ई-प्रशासन प्रणालीविषयक कार्यवाही करताना या सुचनांचा अवलंब करण्यात यावा, व याबाबत काणतीही अडचण असल्यास, त्याबाबत शासनास स्वतंत्र संदर्भ करण्यात यावा.

(डॉ. संजय बेलसरे)
शासनाचे उपसचिव

सहपत्र:- जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती

# जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती

**जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पत्र क्र. ____________, दि. /09/2015 चे सहपत्र**

कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-प्रशासन प्रकल्पांची कार्यपध्दती खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे. त्यामध्ये खालील 10 बाबींचा समावेश आहे-

(I) ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना-टिप्पणी (Concept Note) तयार करणे
(II) विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee)
(III) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे
(IV) प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे
(V) यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे
(VI) केलेल्या कामाची देयके देणे
(VII) Change Request मंजुर करणे
(VIII) सुधारीत प्रशासकीय मान्यता
(IX) पुर्णत्व अहवाल
(X) प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण

सविस्तर कार्यपध्दती खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| (I) | **ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करणे** |
| | सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 29/10/2001 च्या शासन निर्णयातील अ.क्र. 2.1 नुसार संगणकीकरणाच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक जबाबदारी ही त्या त्या प्रशासनिक विभागाची असेल असे [illegible] देण्यात आले आहेत. या अनुषंगाने जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन विषयक प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी करणे यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे (Project Management Office, Pune) या कार्यालयाची स्थापना दि. 9/8/2012 रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. या कार्यालयामार्फत विभागाच्या गरजेनुरुप [illegible] शासनाच्या आदेशानुसार ई-प्रशासन प्रकल्पांची आखणी करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांना खालील पध्दतीने प्रस्ताव प्राप्त [illegible] शकतात-<br>1) जलसंपदा विभागाकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प<br>2) जलसंपदा विभागाच्या आवश्यकतेनुसार व Vision २०२० मधील ई-प्रशासनावरील अहवालाच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत प्रस्तावित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प<br>3) जलसंपदा विभागातील कोणत्याही कार्यालयाकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प<br>4) केंद्र शासन [illegible] DeitY यांचेकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प<br>5) राज्य शासन माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प<br>अशा प्रकारे प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या प्रत्येक कामाची स्वतंत्र असणारी संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करावी. सदर टिप्पणीस प्रथमत: जलसंपदा विभागाची तत्वत: मंजुरी घेण्यात यावी. सदर |

टिप्पणीमध्ये खालील बाबींचा समावेश करावा-

1) सर्वसाधारण टिप्पणी:

i) प्रकल्पाचे प्रस्तावित नाव

ii) प्रकल्प कोणी प्रस्तावित केला

iii) प्रकल्पाची आवश्यकता

iv) यापुर्वी अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यात आला होता काय? असल्यास त्याची सद्यस्थिती

v) प्रस्तावित प्रकल्पापासुन मिळणारे फायदे

vi) प्रकल्पाची घटक / उप-घटक / मोड्युल्स : ई-प्रशासन प्रणालींचे घटकनिहाय विकसन करुन नंतर त्यांची जोडणी (integration) करणे शक्य असल्याने गरजेनुरुप छोट्या स्वरुपात कामे हाती घेण्यात यावी, व अशी कामे पुर्ण करुन त्यांची जोडणी करण्यात यावी.

vii) तांत्रिक रचना (Architecture)

viii) प्रकल्पासाठी आवश्यक Software / hardware / connectivity व त्यांची मालकी (proprietary) बाबतचा तपशिल

ix) गरजेनुरुप तांत्रिक सल्लागार / DIT / NIC / Mahaonline आदींनी दिलेला सल्ला

x) प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध असलेले संभाव्य पर्याय

xi) इतर ई-प्रशासन प्रकल्पांसोबत जोडणीबाबतचे धोरण

xii) परीवर्तन व्यवस्थापन व मनुष्यबळ क्षमता उभारणीसाठी (Change Management & Capacity Building) आवश्यक असलेली उपाययोजना

xiii) प्रकल्पांची परिसिमा (Limitation)

2) कालावधी:-

i) प्रकल्पाचे नियोजन करुन मान्यता मिळण्यासाठी लागणारा संभाव्य कालावधी

ii) प्रकल्पाची अंमलबजावणी करुन तो उपलब्ध करुन (Go Live)देण्यासाठी लागणारा कालावधी

iii) प्रकल्पाचा वापराचा कालावधी (मर्यादित कालावधीसाठी आहे के अमर्याद कालावधीसाठी आहे याचा तपशिल)

iv) प्रकल्प समाप्ती

3) प्रकल्प राबविण्याची प्रस्तावित केलेली यंत्रणा:-

i) राज्य शासनाचा माहिती व तंत्रज्ञान विभाग

ii) महाऑनलाईन लिमिटेड

iii) राष्ट्रीय सुचना विज्ञान [redacted] (NIC)

iv) महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर, नागपुर (MRSAC)

v) / राज्य शासनाच्या अखत्यारित असलेली अथवा शासनाचा हिस्सा / सह भाग असलेली संस्था अथवा कंपनी

vi) केंद्र / राज्य शासन यांचेमान्यतेनुसार दर-करार मार्फत खरेदी

vii) माहिती व तंत्रज्ञान विभागाद्वारे empaneled केलेल्या संस्था / कंपन्या

viii) Proprietary प्रणाली असल्यास, सदर प्रणाली उपलब्ध करुन देणारी संस्था

ix) निविदा (RFP / e-Tender) द्वारे यंत्रणेची [redacted] करणे

4) प्रकल्प राबविण्याची यंत्रणा निश्चित करण्यासाठीचा निकष:-

i) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (i) ते (vi) यांचेमार्फत प्रणाली विकसित करणे, Man-Month Basis वर मनुष्यबळ पुरविणे, Cloud पध्दतीने सेवा उपलब्ध करुन देणे इ. स्वरुपाचे प्रस्तावित असल्यास, कोणत्याही निविदेची आवश्यकता नाही. संबंधित संस्थेकडुन होणारा प्रस्ताव गृहित धरण्यात यावा. सदर प्रस्तावास खाली (ii) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी व संबंधित यंत्रणेसोबत करारनामा करण्यात यावा.

ii) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (vii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित असल्यास सदर प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी

समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर दि. 29/01/2001 रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार मर्यादित निविदा पध्दतीचा अवलंब करावा.

iii) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (viii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित असल्यास, संबंधित संस्थेकडुन प्राप्त होणाऱ्या प्रस्तावास जलसंपदा विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्यात यावी.

iv) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (ix) मार्फत कामे विकसित करणे प्रस्तावित असल्यास, खाली (V) "यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे" मध्ये दिलेल्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करावी. यामध्ये Item-Rate पध्दतीने काम करणे प्रस्तावित असल्यास (जसे- हार्डवेअर खरेदी, proprietary software खरेदी, इ.), प्रथमत: अशा प्रस्तावास (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीचा अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी. जर शासनाच्या DeitY यांनी निर्देशित केलेल्या कोणतेही प्रारुप RFP अथवा प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या Bid Document यामार्फत काम करणे प्रस्तावित असेल तर अशा प्रस्तावाची तपासणी माहिती व तंत्रज्ञान संचालनालय मार्फत करण्यात यावी व त्यानंतर अशा प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी.

5) प्रकल्पाचा संभाव्य खर्च

अ) खर्चाचा घटकवार तपशिल

i) प्रणाली विकसन (Development)

ii) प्रणालीचे व्यवस्थापन व निर्वाह (Maintenance & Sustenance)

iii) क्षमता उभारणी (Capacity Building)

आ) प्रस्तावित केलेले दर कशावर आधारीत आहे याचा तपशिल

इ) पहिल्या वर्षी लागणारा खर्च

ई) त्या नंतरच्या प्रत्येक वर्षी लागणारा खर्च

उ) प्रकल्पाचा खर्च कोणत्या शिर्षामधुन प्रस्तावित आहे

उपरोक्त प्रस्ताव तयार करताना विविध प्रकल्प घटकांचे / बाबींचे /मनुष्यबळांचे दर ठरविताना केंद्र / राज्य शासनाने मंजुर केलेले दरकरार उपरोक्त अ.क्र. 3 मधील (i) ते (vi) मार्फत प्राप्त होणारे दर किंवा प्रचलित पध्दतीने बाजारातुन मागविण्यात आलेले दर यांच्या आधारे संकल्पना टिप्पणी तयार करण्यात यावी. तसेच सदरील टिप्पणी तयार करताना, आवश्यकता भासल्यास प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी नोंदणीकृत संस्थांकडुन (Empaneled Agencies) प्रस्ताव मागवावा. तसेच इतर विभागात राबविण्यात येणाऱ्या ई-प्रशासन प्रणालींचा आधार घेण्यात यावा.

जी.कामे बाह्य सहाय्य (Externally Funded) प्रकल्पांतर्गत करावयाची आहेत, त्या कामांच्या अटी विचारात घेऊन या निर्देशांमध्ये दिलेल्या सुचना योग्य त्या फेरफारासह लागु राहतील.

(II) विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee)

उपरोक्त अ.क्र. 1 मध्ये नमुद केल्यानुसार प्रकल्पांच्या संकल्पना टिप्पणीस जलसंपदा विभागाने मान्यता प्रदान केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 29/10/2001 तसेच जलसंपदा विभागाच्या दि. 12/03/2013 रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्यात यावी.

| प्रकल्पाची किंमत | ई-प्रशासन प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मान्यता |
|---|---|
| रु. 10 लक्ष पर्यंत | जलसंपदा विभाग |
| रु. 10 लक्ष ते 5 | जलसंपदा विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समिती |

81

| | | |
|---|---|---|
| | कोटी पर्यंत | |
| | रु. 5 कोटी पेक्षा अधिक | उच्चाधिकार समिती |
| (III) | प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे | |
| | उपरोक्त (II) नुसार मान्यता प्राप्त झाल्यानंतर जलसंपदा विभागामार्फत अशा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत हाती असलेल्या कामांची व्याप्ती व त्यासाठी उपलब्ध असणारे मनुष्यबळ [illegible] विचार करुन नवीन काम प्रस्तावित करावे. आवश्यकता भासल्यास, शासनाकडुन मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाईल. दि. 18 जुन 2010 रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अर्धा टक्का निधी ई-प्रशासन प्रकल्पांकरिता वापरावा असे निर्देश देण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने नवीन काम हाती घेण्यापुर्वी चालु असलेल्या कामांची अद्ययावत किंमत ही उपलब्ध असलेल्या अनुदानाच्या तिप्पटी [illegible] जास्त नसेल याची खात्री प्रशासकीय मान्यता प्रदान करतेवेळी करण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रशासकीय मान्यता देताना आर्थिक निकषांची अट (उदा.- लाभ-व्यय गुणोत्तर अथवा परताव्याचा दर आदी) अनिवार्य असणार नाही. | |
| (IV) | प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे | |
| | उपरोक्त (III) नुसार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत अशा प्रस्तावास [illegible] मान्यता देणेकरिता प्रस्ताव तयार करण्यात येईल व अशा प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, 1984 तसेच तदअनुषंगाने निर्गमित केलेल्या निर्देशां[illegible] असतील. सद्यस्थितीत हे अधिकार खालीलप्रमाणे आहेत- | |

| अ.क्र. | प्रकल्पाची किंमत (प्रत्येक वर्षाची किंमत) | तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम अधि[illegible] |
|---|---|---|
| 1) | एकुण किंमत रु. 25 लक्ष पर्यंत | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे येथील कार्यकारी अभियंता |
| 2) | एकुण किंमत रु. 25 लक्ष पेक्षा जास्त व रु. 62.5 लक्ष पेक्षा कमी | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे ज्या कार्यालयाचे अधिपत्याखाली आहे ते अधीक्षक अभियंता |
| 3) | एकुण किंमत रु. 62.5 लक्ष पेक्षा जास्त | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे ज्या कार्यालयाचे अधिपत्याखाली आहे ते मुख्य अभियंता |

| | | |
|---|---|---|
| (V) | यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे | |
| | उपरोक्त अ.क्र. (I) 3 मधील (i) ते (vii) मार्फत प्रणालीचे विकसन करण्याचे प्रस्तावित असल्यास, व अशा प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समिती किंवा उच्चाधिकार समितीची मान्यता प्राप्त झाली असल्यास, कोणतीही निविदा काढण्याची आवश्यकता नाही. तथापि अ.क्र. (I) 3 मधील (viii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित असल्यास, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, 1984 तसेच तदअनुषंगाने निर्गमित केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. यातील प्रमुख टप्पे पुढील प्रमाणे आहेत- | |
| | i) | निविदा कागदपत्रे (Tender / Bid Document / Request for Proposal |

| | |
|---|---|
| (VII) | Change Request मंजुर करणे |
| | काही विशिष्ट प्रकरणी प्रणाली विकसित करणाऱ्या यंत्रणेमार्फत Change Request मंजुर करावा लागतो. अशा प्रकरणी, संबंधित यंत्रणेकडुन सदर बदल करण्यासाठी लागणारा कालावधी प्रथमत: प्राप्त करावा. तो कालावधी योग्य असल्याबाबत सल्लागार यांचेकडुन तपासणी करावी. तांत्रिक सल्लागाराचे पद काही का…व असल्यास, सदर कामाची सखोल तपासणी संबंधित उप-अभियंता सदर प्रस्ताव योग्य असल्यास, करारनाम्यातील मंजुर दराने अशा प्रकारच्या Change Request सदर प्रकारची निविदा ज्यांनी मंजुर केली त्यांची मान्यता घेण्यात किंवा प्रकल्प अंमलबजावणी समितीने दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात |
| (VIII) | सुधारीत प्रशासकीय मान्यता |
| | ई-प्रशासन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानंतर प्रकल्पाची अंमलबजावणी करतेवेळी प्रणालीमध्ये कोणताही बदल करणे आवश्यक असल्यास व त्यामुळे प्रकल्पाच्या मंजुर किंमतीमध्ये 10 टक्के किंवा 1 कोटी जे कमी असेल त्यापेक्षा अधिक वाढ होत असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत तयार करण्यात यावा. अशा बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापुर्वी उपरोक्त (II) नुसार ज्यांनी प्रकल्पास मान्यता दिली आहे, त्यांची मान्यता घेण्यात<br>प्रकल्प विकसनाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्रणाली वापरात आल्यावर तंत्रज्ञातील प्रगतीमुळे अथवा Version Upgrade अथवा enhancements इ. यामुळे प्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास, व अशा बाबी प्रमा प्रस्ताव व करारनामा यामध्ये अंतर्भुत नसल्यास अशा बाबींचा स्वतंत्र प्रस्ताव उपरोक्त (I) नुसार सादर करण्यात यावा. |
| (IX) | पुर्णत्व अहवाल |
| | ई-प्रशासन प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर पुर्णत्व अहवाल तयार करुन तो उपरोक्त (II) नुसार ज्यांनी मान्यता दिली आहे, त्यांना माहितीस्तव सादर करण्यात यावा. या अहवालामध्ये प्रकल्पामुळे विभागास मिळालेल्या लाभाचा तसेच त्यामधुन मिळालेल्या अनुभवाचा उहापोह करावा. ई-प्रशासन हे नवीन तंत्रज्ञान असल्याने व त्यातील बाबींचे सखोल ज्ञान विभागाकडे नसल्याने सदर प्रकल्प राबविताना येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची देखील मांडणी पुर्णत्व अहवालामध्ये करण्यात यावी. |
| (X) | प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण |
| | ई-प्रशासन प्रणालीचे विकसन करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यात यावे. यासाठी आवश्यकता भासल्यास ज्यांनी प्रणालीचे विकसन केले आहे त्यांची अथवा नवीन यंत्रणेची नेमणुक उपरोक्त सुचनांचा अवलंब करुन करता येईल.<br>तसेच सदर प्रणालीचे हस्तांतरण करण्यासाठी विकसकाकडुन आवश्यक ते प्रशिक्षण घेण्यात यावे. त्याशिवाय प्रणालीबाबत आवश्यक असलेले Documents, Manuals आदी प्राप्त करुन घेण्यात यावे. प्रत्येक प्रणालीकरिता Admin नेमण्यात व त्यांनी सदर प्रणालीसाठी आवश्यक असणारी कार्यवाही पार<br>प्रणाली व्यवस्थापनाधीन असताना काही कारणास्तव - इतर ई-प्रशासन प्रकल्पांसोबत जोडणी करणे, Enhanced Reports विकसित करणे, राहुन गेलेल्या त्रुटयांचे निराकरण करणे, Government Process Re-engineering च्या अनुषंगाने प्रणालीमध्ये यथायोग्य बदल करणे या देखील प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत उपरोक्त सुचनांचा अवलंब करुन यंत्रणेची नेमणुक करता येईल.<br>जलसंपदा विभागाचे संकेतस्थळाचे विकसन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत करण्यात आले आहे. शासकीय विभागांच्या संकेतस्थळाचे पर्यवेक्षण करण्यासाठी दि. 21 जुन 2014 रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयान्वये संकेतस्थळ पर्यवेक्षण समिती (Website Oversight Committee) ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच या समितीमार्फत तसेच दि. 5 डिसेंबर 4 रोजीच्या जलसंपदा विभागाच्या कार्यालयीन आदेशान्वये जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळासाठी वेब माहिती व्यवस्थापक (Web Information Officer) आणि मजकुर पुनर्विलोकन समिती (Content Review |

83

| | | |
|---|---|---|
| | | Committee) गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांमार्फत तसेच शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळामध्ये वेळोवेळी [illegible] करावे लागतात. या शिवाय नवीन प्रकारची माहिती उपलब्ध करणे, ती अद्ययावत करणे इत्यादी कामे देखील करावे लागतात. जलसंपदा विभागाचे www.wrd.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ ई-जलसेवा प्रणालीमधील मोड्युल एम-0 (M0) असुन, ते मे. विप्रो लिमिटेड मार्फत विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात उपरोक्त प्रमाणे आवश्यक असणारे बदल मे. यांचेमार्फत चालु निविदेमधील तरतुदी - Change Request नुसारच करण्यात यावे. यात अडचण निर्माण झाल्यास, याबाबत शासन मान्यतेने नवीन विकसक नेमण्यात यावा. |

जलसेवा

जलसंपदा विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता,
जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे.

दुरध्वनी: ०२०-२५४४०३९५

ई-मेल sewregc.wrd@maharashtra.gov.in जलसंपत्ती भवन, कर्वे पुतळयाजवळ, कोथरुड, पुणे- ४११ ०३८.

जा.क्र.: ईप्रमं.आस्था-१/वि.प्र/ (०७/१९)/ ४४४ /सन-२०२३ दिनांक:- २५ / ०७ /२०२३

# प्रमाणपत्र

विषय:- ई-प्रशासन अंतर्गत सेया कार्यकारी / अकार्यकारी प्रकारात गणनेबाबत

संदर्भ:- श्रीमती. श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहाय्यक मुख्य अभियंता यांचा दि.१४ जुन, २०२३ रोजीचा विनंती अर्ज.

जलसंपदा विभागाचे प्रशासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी राज्याचे ई-प्रशासन धोरण स्विकारले असून जलसंपदा विभागासाठी ई प्रशासन प्रकल्प विकसित करणेसाठी जलसंपदा ई-प्रशासन मंडळ ची निर्मिती २ एप्रिल २०१६ रोजी केली आहे.

ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याचे प्रक्रियेत प्रकल्प अहवाल तयार करणे, सक्षम स्तरावर प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा प्रकिया राबविणे, निविदा मूल्यांकन करणे, अभिकरणाकडून प्रकल्प विकसित करुन घेणे , प्रकल्प राज्यभरातील जलसंपदा विभागाचे कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणे, ई-प्रशासन प्रकल्पाबाबत प्रशिक्षण देणे, राज्यस्तरीय समिती चे कामकाज इ बाबींचा अंतर्भाव होतो.

ई-प्रशासन येथे विशेष प्रकारचे व जलसंपदा विभागाचे नियमित कामकाजा पेक्षा वेगळया पध्दतीचे कामकाज स्वरुप असलेले तांत्रिक अधिकारी तसेच कर्मचारी यांनी ई-प्रशासन मंडळ अंतर्गत सेवा देणेसाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

ई-प्रशासन प्रकल्प राबविताना कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही कार्यप्रकारची कामे अधिकारी यांना करणे आवश्यक आहे सबब ई प्रशासन मंडळ अंतर्गत केलेला सेवा कालावधी हा आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणणे उचित आहे.

प्रमाणित करणेत येते की, श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड,सहाय्यक मुख्य अभियंता हे जलसंपदा ई-प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे येथे दि.१९/०९/२०१६ ते दि.१०/०८/२०२० या कालावधीत कार्यरत होत्या.

(अभय गो.काटकर)
अधीक्षक अभियंता
जलसंपदा ई प्रशासन मंडळ,
कोथरुड, पुणे

प्रत:- मा. अवर मुख्य सचिव,जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(लक्षेपण -श्रीमती राखी चव्हाण, अवर सचिव (आस्था १), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन)

असा. क्र. ४२

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआर/साऊथ-२२४/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

सोमवार, एप्रिल ७, २००८/चैत्र १८, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### जलसंपदा विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ एप्रिल २००८

### अधिसूचना

**पाटबंधारे सेवाप्रवेश.**

**क्रमांक केवोसेस** १०००/(१०३/२०००)/आ(सनि) — भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट 'अ' मधील अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) नियम, १९९६ या नियमामध्ये पुढील सुधारणा करीत आहेत —

१. या नियमास पाटबंधारे विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट 'अ' मधील अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००८ असे संबोधण्यात येईल.

२. पाटबंधारे विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट 'अ' मधील अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) नियम १९९६ च्या प्रस्तावनेमधील (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम "

असा करण्यात आला आहे) " पाटबंधारे विभाग " या शब्दांऐवजी " जलसंपदा विभाग " असे शब्द स करण्यात यावेत.

३. मुख्य नियमातील नियम १ मधील " पाटबंधारे विभाग " या शब्दांऐवजी " जलसंपदा विभाग" शब्द समाविष्ट करण्यात यावा.

४. मुख्य नियमातील नियम १ नंतर खालीलप्रमाणे नियम समाविष्ट करण्यात यावा —

" १अ. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात,—

(अ) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

(ब) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन.

(क) " विभाग " म्हणजे महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग "

५. मूळ नियमातील नियम २ मध्ये जेथे जेथे " पाटबंधारे विभाग " असे शब्द आलेले आहेत तेथे " जलसंपदा विभाग" असे शब्द समाविष्ट करण्यात यावेत

६. मुख्य नियमातील नियम ३ वगळून त्याऐवजी पुढीलप्रमाणे नियम समाविष्ट करण्यात यावा

" ३. नियम २ च्या उपबंधांना बाधा येऊ न देता नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींना विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट 'अ' मध्ये असताना पुढील दोन गटापैकी प्रत्येक गटातील कोणत्याही एका किंवा अधिक शाखांतील कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असला पाहिजे —

(अ) (एक) संशोधन,

(दोन) सकल्पचित्र,

(तीन) प्रकल्प अहवाल तयार करणे,

(चार) अन्वेषण,

(पाच) प्रशिक्षण कार्य, किंवा

(सहा) या सोबतच्या परिशिष्ट मध्ये उल्लेखित कार्यालयातील गट-अ मधील कोणत्याही पदावरील केलेली सेवा

(ब) (एक) बांधकाम किंवा

(दोन) व्यवस्थापन

परंतु असे की, शासन आवश्यक असेल तेव्हा, परिशिष्ट मध्ये उल्लेखित [illegible] वेळोवेळी सुधारणा करू शकेल "

## परिशिष्ट

### (नियम ३ पहावा)

(१) मंत्रालयातील कोणत्याही विभागातील कार्यकारी अभियंता व पदसिद्ध अवर सचिव

(२) मुख्य अभियंता किंवा अधीक्षक अभियंता कार्यालयातील सहायक मुख्य अभियंता किंवा उप अधीक्षक अभियंता पदे

(३) सर्व पाटबंधारे विकास महामंडळ (मुख्यालय) कार्यालयातील पदे.

(४) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक येथील पदे

(५) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथील पदे.

(६) जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद, येथील पदे

(७) मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प नाशिक कार्यालयातील पदे

(८) जलसंपत्ती विकास केंद्र, औरंगाबाद, येथील पदे

(९) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक येथील पदे

(१०) धरण सुरक्षितता संघटना, नाशिक येथील पदे

(११) पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे येथील पदे.

(१२) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत रोजगार हमी योजनेखालील पदे

(१३) पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ अंतर्गत पदे

(१४) भूकंप पुनर्वसन विभागातील पद

(१५) जलसंपदा विभागातील गुण नियंत्रण मंडळांतर्गत व त्याच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय स्तरावरील पदे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्यं. वि. गायकवाड,
शासनाचे सचिव

जलसंपदा विभागातील
अधीक्षक अभियंता (स्था)
या पदाचे सेवाप्रवेश नियम.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक सेप्रनि-२०१४/(२/१४)/आ.(तांत्रि)
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, नवीन मंत्रालय,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: २५.०७.२०१४

संदर्भ :- १. शासन अधिसूचना, जलसंपदा विभाग, क्र सीडीएस-१२८०/२४२/(१४/८०)/
आस्था(तांत्रि), दिनांक ०१.०३.१९९६
२. शासन अधिसूचना, जलसंपदा विभाग, क्र.सीडीएस-१००७(१०३/२००७)/
आस्था(तांत्रि), दिनांक ०७.०४.२००८

प्रस्तावना:-

जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता (स्था) पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार अधीक्षक अभियंता (स्था) पदावरील पदोन्नतीसाठी विशिष्ट कार्यक्षेत्रातील तीन वर्षे सेवेच्या अनुभवाची अट आहे. सदर कार्यक्षेत्र सेवाप्रवेश नियमातील नियम ६ मध्ये गट अ व गट ब असे वर्गीकृत करण्यात आले आहेत. त्यापैकी "व्यवस्थापन" हा कार्यक्षेत्र गट "ब" मधून वगळून गट "अ" मध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता

शासन निर्णय

संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक ०७.०४.२००८ च्या शासन अधिसूचनेतील नियम ६ मधील "व्यवस्थापन" या कार्यक्षेत्राचा समावेश गट "ब" ऐवजी गट "अ" मध्ये करण्यात येत आहे.

२ उपरोक्त निर्णय तात्काळ अंमलात येईल. याबाबतचे सेवाप्रवेश नियम अधिसूचित करण्याची कार्यवाही यथावकाश करण्यात येईल

३. सदर शासन निर्णय जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सि.र.टकले)
शासनाचे उप सचिव

प्रत,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन -१२), मंत्रालय, मुंबई.
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (ज.स.प्र. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन प्रशिक्षण व व्यवस्थापन संशोधन व सुरक्षितता मेरी, नाशिक
महासंचालक, जल व भूमि व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद,
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळांचे कार्यकारी संचालक.
मुख्य अभियंता व सहसंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंता /अधीक्षक अभियंता.
व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई (प्रसिद्धी)
स्वीय सहायक, मा. मंत्री (जलसंपदा) / मा. मंत्री (कृष्णाखोरे) /
मा. मंत्री लाक्षेवि / मा. राज्यमंत्री (जलसंपदा).
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
जलसंपदा विभागातील सर्व आस्थापना कार्यासन
आ(सनि) कार्यासन संग्रहार्थ.

आवक क्र ??

९०

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग,

तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२७९४५५०/२२०२ ४३३०. Email ID :doestclass1.wrd@maharashtra.gov.in

क्रमांक: संकीर्ण २०२४/प्र.क्र.१७४/२०२४/आ (वर्ग-१). दिनांक:१९.०६.२०२४

प्रति,

मुख्य अभियंता (स्थापत्य),
जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण,
पुणे

विषय : कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गामध्ये पदोन्नती देण्याबाबत.

संदर्भ :-१.जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्र.ई-प्रशासन २०१६/(३६/२०१६)/लपा-१. दि.०२.०४.२०१६

२.जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्र.आढावा २०१८/१४२/२०१८/आ(प्रशि). दि.२०.०८.२०१८

३. जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्र.आढावा २०२३/प्र.क्र.४/आ(पुर्नरचना). दि.२१.०७.२०२३

४. आपले प्रमाणपत्र, जा.क्र.मुअ(स्था)/जविप्र व गुनि/आ-१/१६६९/सन२०२३. दि.२७.१०.२०२३

५. श्रीमती श्रध्दा सा.सुदेवाड, सहायक मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे यांचे पत्र, दि.२९.०५.२०२४

महोदय,

आपले लक्ष संदर्भ क्र.४ येथील प्रमाणपत्राकडे वेधण्यात येत आहे.

२. श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या ई-प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे येथील दि.१९.०९.२०१६ ते दि.१०.०९.२०२० या कालावधीतील सेवा आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणण्याबाबत आपण प्रमाणित केले आहे.

श्रीमती श्रध्दा सा.सुदेवाड यांनी त्यांच्या ई-प्रशासन मंडळ, पुणे येथील कार्यकाळामध्ये केलेल्या MOU ची माहिती

Period - 19.9.2016 To 10.8.2020

| Sr.No. | Name of Project | MOU Date | Agency Name |
|---|---|---|---|
| 1 | Appointment of Consulting Estimated Firm For MWRD | 15-06-2017 | KPMG Advisory Services |
| 2 | EnhancementIn RTS Services | 14-07-2017 | Mahaonline Mumbai |
| 3 | Appointment of Cloud services firm for MWRD | 12-12-2017 | Mahaonline Mumbai |
| 4 | Providing Support & Maintance enhancement of CMS Website for e service book system Phase II | 09-03-2018 | Mahaonline Mumbai |
| 5 | BSNL Internet Leaseline | 28-09-2018 | BSNL Pune |
| 6 | BSNL Internet Leaseline | 28-11-2019 | BSNL Pune |
| 7 | Hosting of e training information management& evoluation system (e times) | 04-03-2020 | Mahaonline Mumbai |

श्रीमती श्रध्दा सा.सुदेवाड यांनी त्यांच्या ई-प्रशासन शाखा, पुणे येथील कार्यकाळामध्ये केलेल्या निविदांची माहिती

Smt. Shraddha Sahebrao Sudewad
Executive Engineer, Governance Computerisation Division, Pune
Duration:-19-09-2016 to 10-08-2020

| Sr.No. | Tender Reference No. | Name of Project | Cost Put to Tender (In Lakhs) | Tender Publish Date | Tender Stage | Tender Awarded to | Work Order Date | Contract (In Lakhs) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender/01 for 2017-18 | Supply and customization of web based e-billing software for Water Resource Department | 35.00 | 25-04-2017 | Retender | Resurgam Solutions Pvt Ltd | 14-07-2017 | 32.90 |
| 2 | E-Tender/02 for 2017-18 | Supply and customization of web based e-billing software for Water Resource Department | 35.00 | 01-06-2017 | AOC | Resurgam Solutions Pvt Ltd | 14-07-2017 | 32.90 |
| 3 | E-Tender/03 for 2017-18 | Supply of web based mobile application Reservoir Status for dam storage level display and monitoring for Water Resources Department | 9.90 | 16-08-2017 | AOC | Parrun Services Private Limited | 24-10-2017 | 9.80 |
| 4 | e-Tender 3/2017-18 | Supply and customization of web based Estimate and Draft Tender Papers application for Water Resources Department | 108.85 | 27-02-2018 | Retender | Mechatronics Systems Pvt Ltd | 18-06-2018 | 81.42 |
| 5 | e-tender 04/2017-18 | Design and development of web and Mobile based Quality Control system for Water Resources Department | 35.35 | 21-03-2018 | Retender | Mechatronics Systems Pvt Ltd | 29-06-2018 | 27.93 |
| 6 | e-Tender 01/2018-19 | Comprehensive annual maintenance of Video Conference units | 35.50 | 09-04-2018 | Retender | Intellicon Pvt Ltd | 16-11-2018 | 42.96 |
| 7 | e-Tender 02/2018-19 (Second call) | Supply and customization of web based Estimate and Draft Tender Papers application for Water Resources Department | 108.85 | 16-04-2018 | AOC | Mechatronics Systems Pvt Ltd | 18-06-2018 | 81.42 |
| 8 | e-Tender 03 for 2018-19 (Second Call) | Design and development of web and Mobile based Quality Control system for Water Resources Department | 35.35 | 16-04-2018 | AOC | Mechatronics Systems Pvt Ltd | 29-06-2018 | 27.93 |
| 9 | e-Tender 05/2018-19 (Third Call) | Comprehensive Annual Maintenance of Video Conference Units | 35.50 | 06-08-2018 | Retender | Intellicon Pvt Ltd | 16-11-2018 | 42.96 |
| 10 | WRD e-Tender-01/2019-20 | Design and Development of five Irrigation Development Corporation websites for Maharashtra WRD | 36.00 | 07-09-2019 | AOC | Zapuch Solutions Private Limited | 02-03-2020 | 21.77 |
| 11 | WRD e-Tender 02/2019-20 | Design and development of Web and Mobile based Data storage and sales, Flood Management system for Maharashtra Water Resources Department | 90.00 | 07-09-2019 | AOC | Mechatronics Systems Pvt Ltd | 17-02-2020 | 52.98 |
| 12 | WRD e-Tender 03/2019-20 | e-Jalseva Cloud Migration, Development of Master Database Module for Maharashtra Water Resources Department | 243.00 | 12-09-2019 | Retender | Cyfuture India Pvt Ltd | 18-03-2020 | 110.92 |
| 13 | WRD e-Tender 04/2019-20 | Appointment of a Helpdesk service provider for Maharashtra Water Resources Department | 196.00 | 01-11-2019 | AOC | Cyfuture India Pvt Ltd | 30-03-2020 | 27.13 |
| 14 | WRD e-Tender 03/2019-20 (Second call) | e-Jalseva Cloud Migration, Development of Master Database Module for Maharashtra Water Resources Department | 243.00 | 14-11-2019 | AOC | Cyfuture India Pvt Ltd | 18-03-2020 | 110.92 |
| 15 | MWRD e-Tender 05/2019-20 | 100 Mbps leased line dedicated Internet connectivity at Jalsampada Bhavan, Kothrud for 3 Years | 16.50 | 22-01-2020 | Retender | Tender Cancelled on second call after extension to BSNL | | |
| 16 | WRD e-Tender 07/2019-20 | RFP for Design and Development of MELA, MERI and CE Hydrology Project websites for Maharashtra Water Resources Department | 10.00 | 13-03-2020 | AOC | Sakum Solutions Pvt Ltd | 29-10-2020 | 12.89 |
| 17 | WRD e-Tender 06/2019-20 | Design, Development, Testing, Implementation, Hosting, Operation and Maintenance of Web and Mobile based Integrated Irrigation Management Application for Maharashtra Water Resources Department | 233.00 | 13-02-2020 | Cancelled | NA | | |
| 18 | WRD e-Tender 08/2019-20 | Upgrade the Network Infrastructure, Set up a basic Network Operations Centre (NoC), LAN Network and Wi-Fi Access Points at Jalsampada Bhavan, Kothrud | 13.53 | 14-02-2020 | Cancelled | NA | | |
| 19 | WRD e-Tender 05/2019-20 (2nd Call) | 100 Mbps leased line dedicated Internet connectivity at Jalsampada Bhavan, Kothrud for 3 Years | 16.50 | 02-03-2020 | Cancelled | NA | | |
| 20 | WRD e-Tender 09/2019-20 | Promotional and Training Videos for e-Governance Projects of Maharashtra Water Resources Department | 22.50 | 12-03-2020 | AOC | Prabhu Plus Private Limited | 27-11-2020 | 9.91 |

EOI Details

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 21 | EOI Based | Appointment of Consulting Firm for MWRD | 487.30 | 07-03-2017 | AOC | KPMG | 15-06-2017 | 487.30 |

NOTE :- As Executive Engineer, Governance Computerisation Division is HOD for all the Tenders / EOI floated, is an integral part of Tender Evaluation and Award.

92

ANNGXURG - M4

180 93

संदर्भ


ई-जलसेवा

जलसंपदा विभाग

दुरध्वनी: ०२०- २५४४०३९५

ई-मेलsewregc.wrd@maharashtra.gov.in


महाराष्ट्र शासन

# अधीक्षक अभियंता,
## जलसंपदा ई-प्रशासन मंडळ, पुणे.


जलसंपदा भवन, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, पुणे- ४११०३८.


जा.क्रं. जईप्रमंपुण/आस्था-१/ ६३४ /२०२१ दि १९/०५/२०२१

## प्रमाणपत्र

विषय :- ई प्रशासन अंतर्गत सेवा कार्यकारी/अकार्यकारी प्रकारात गणनेबाबत.

संदर्भ :- श्री. अ. गो. फाटकर यांचा विनंती अर्ज दि १०/०५/२०२१

जलसंपदा विभागाने प्रशासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी राज्याचे ई प्रशासन धोरण स्वीकारले असून जलसंपदा विभागासाठी ई प्रशासन प्रकल्प विकसित करणेसाठी जलसंपदा ई प्रशासन मंडळ ची निर्मिती २ एप्रिल २०१६ रोजी केली आहे.

ई- प्रशासन प्रकल्प राबविण्याच्या प्रक्रियेत प्रकल्प अहवाल तयार करणे, सक्षम स्तरावर प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा प्रक्रिया राबविणे, निविदा मूल्यांकन करणे, अभिकरणाकडून प्रकल्प विकसित करून घेणे,प्रकल्प राज्यभरातील जलसंपदा विभागाचे कार्यालयासाठी उपलब्ध करून देणे, ई प्रशासन प्रकल्पाबाबत प्रशिक्षण देणे, राज्यस्तरीय समिती चे कामकाज इ बाबींचा अंतर्भाव होतो.

ई प्रशासन येथे विशेष प्रकारचे व जलसंपदा विभागाचे नियमित कामकाज पेक्षा वेगळ्या पद्धतीचे कामकाज स्वरूप असलेले तांत्रिक अधिकारी तसेच कर्मचारी यांनी ई प्रशासन मंडळ अंतर्गत सेवा देणेसाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

ई प्रशासन प्रकल्प राबविताना कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही कार्यप्रकाराची कामे अधिकारी यांना करणे आवश्यक आहे तसेच ई प्रशासन मंडळ अंतर्गत केलेला सेवा कालावधी हा आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणणे उचित आहे

प्रमाणित करणेत येत की श्री अभय गोविंद फाटकर हे जलसंपदा ई प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता बांधकाम व्यवस्थापन संगणकीकरण विभाग पुणे येथे दि १/०८/२०१६ ते २८/११/२०१७ या कालावधीत कार्यरत होते.

(प्र.रा.नार्वेकर)
अधीक्षक अभियंता,
जलसंपदा ई प्रशासन मंडळ,
कोथरूड पुणे.

प्रत - मा प्रधान सचिव जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(लक्षवेध : श्री.स.ग.गांगरकर, अवर सचिव आस्थापना जलसंपदा विभाग मंत्रालय मुंबई )
प्रत - मा मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत - श्री अभय गो फाटकर,कार्यकारी अभियंता यांना माहितीस्तव

ANNEXURE - M : 5 94



## बैठकीचे इतिवृत्त

दिनांक २६.०३.२०२४

सन २०२३-२४ च्या निवडसूचीमधून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीकरिता विचारक्षेत्रात येणाऱ्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील अधिका-यांची गट अ व गट ब मधील सेवा अनुभवाची निश्चिती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त

जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाचे सेवाप्रवेश नियम दिनांक ०१.०३.१९९६ च्या अधिसूचनेन्वये विहित करण्यात आले असून त्यामध्ये दि. ०७.०४.२००८ रोजीची अधिसूचना व दि. २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सेवाप्रवेश नियमातील नियम २ नुसार स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी धारण करणाऱ्या तसेच जलसंपदा विभागाच्या नियंत्रणाखाली कमीत-कमी सात वर्षे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हे पद धारण केलेल्या व्यक्तींमधून सक्त निवडीने योग्य व्यक्तीला पदोन्नती देवून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) हे पद भरण्यात येते. तसेच, दिनांक ०१.०३.१९९६ च्या सेवाप्रवेश नियमातील नियम ३ नुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-अ किंवा गट-ब मध्ये असताना आणि दिनांक ०७.०४.२००८ ची अधिसूचना व दिनांक २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सेवाप्रवेश नियम - ३ मध्ये केलेल्या सुधारणेनुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट "अ" या निम्न संवर्गात कार्यरत असताना गट-अ आणि गट-ब अशा वर्गीकृत केलेल्या कार्यप्रकारातील प्रत्येकी तीन वर्षे सेवेच्या अनुभवाची अट विहित आहे.

२. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील अभियांत्रिकी गट "अ" व गट "ब" मध्ये वर्गीकृत केलेल्या पदावरील सेवा असणारी पदे निश्चित करण्यासाठी शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांक: समिती २०२४/ प्र.क्र.३३/आ (संनि), दिनांक ०५.०३.२०२४ अन्वये सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

३. अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावरील पदोन्नतीसाठी सन २०२३-२४ या निवडसूचीकरीता सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीची प्रथम बैठक दिनांक ०६.०३.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांचा सेवा तपशील तपासून त्यांनी केलेल्या कामकाजानुसार प्राथमिक स्वरुपात गट निश्चित करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला :-

(१) जलसंपदा विभागात नियुक्तीपूर्वी अन्य विभागात महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या सेवेच्या/अनुभवाच्या कार्यप्रकाराबाबत संबंधित विभागाकडून माहिती मागविण्यात यावी.

(२) पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील जे अधिकारी त्यांच्या सेवा कालावधीत अन्य विभागातील पदांवर प्रतिनियुक्तीने कार्यरत होते त्यांच्या सेवेच्या/अनुभवाच्या कार्यप्रकाराबाबत संबंधित विभागाकडून माहिती मागविण्यात यावी.

(३) पदो...च्या विचारक्षेत्रातील काही अधिकाऱ्यांच्या प्रकरणी त्यांच्या सेवा कालावधीत ते कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या नावावरुन त्यांच्या सेवेचा/अनुभवाचा कालावधी गट-अ व गट-ब यामधील नेमक्या कोणत्या कार्यप्रकारातील आहे याचा बोध होत नसल्याने खालील अधिकाऱ्यांबाबत त्यांच्या सेवा कालावधीतील कामाच्या कार्यप्रकाराबाबतची कार्यालयनिहाय माहिती विस्तृत तपशीलासह संबंधित मुख्य अभियंत्यांकडून प्रमाणित करुन मागविण्यात यावी :-

(१) श्री.श्रीराम विजय हजारे

(२) श्रीमती रुपालीदगडू ठोंबरे

(३) श्री.सुनिल गोरुलाल राठी

(४) श्री.स.म.ह.शेख

४. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीची द्वितीय बैठक दिनांक २८.०३.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता संपन्न झाली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते:-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | डॉ.सं.म.बेलसरे | सचिव (लाक्षेवि) | - अध्यक्ष |
| (२) | डॉ.सं.म.बेलसरे | सचिव (प्रकल्प समन्वय)(अति.कार्य.) | - सदस्य |
| (३) | श्री.अ.ल.पाठक | मुख्य अभियंता (द व प्र) तथा सह सचिव | - सदस्य |
| (४) | श्री.उ.र.दहिफळे | उप सचिव (सेवा) | - सदस्य |
| (५) | श्री.अ.वि.देवकाते | उप सचिव (प्रशा) | - सदस्य |
| (६) | श्रीमती राखी सं.चव्हाण | अवर सचिव (सेवा) | - सदस्य सचिव |

५. विचारक्षेत्रातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचा संबंधित मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता यांनी शासनास पाठविलेला सेवा तपशील समितीसमोर सादर करण्यात आला. समितीने कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या सेवा तपशीलांची छाननी करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला :-

(१) विचारक्षेत्रातील काही कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी त्यांच्या सेवा कालावधीत अतिरिक्त कार्यभार सांभाळला असल्याची बाब समितीच्या निर्दशनास आली. अतिरिक्त कार्यभार सांभाळत असताना त्या-त्या पदाचे प्रत्यक्ष काम केले जात असल्याने अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी हा त्या पदावरील सेवेचा प्रत्यक्ष व पूर्ण कालावधी ग्राह्य धरण्याचा समितीने निर्णय घेतला.

(२) जलसंधारण विभाग/लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) येथे सर्वेक्षण, अन्वेषण व व्यवस्थापन असे स्वतंत्र विभाग/ उप विभाग नसल्यामुळे विचारक्षेत्रातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचा त्या विभागातील /पदावरील कामकाजाचा अनुभव गट-अ व गट-ब या दोन्ही कार्यप्रकारामध्ये ग्राह्य धरण्याबाबत समितीने निर्णय घेतला.

(३) जलसंपदा विभागात नियुक्तीपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती रुपाली दगडू ठोंबरे यांच्या त्या विभागातील सेवेच्या/

96

अनुभवाच्या कार्यप्रकाराबाबत संबंधित विभागाकडून मागविण्यात आलेली अधिकची माहिती अद्याप

अप्राप्त असल्याने अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाच्या सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (ब) च्या

पुर्ततेच्या अनुषंगाने त्यांचे प्रकरण खुले ठेवण्याबाबत समितीने निर्णय घेतला.

विचारक्षेत्रातील श्री.मिलींद आ.वाणी, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हे त्यांच्या सेवा कालावधीत गृह,

(४) नगर विकास व गृहनिर्माण विभागांतील विविध पदांवर प्रतिनियुक्तीने कार्यरत होते/आहेत. त्यांच्या

प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील सेवेच्या/अनुभवाच्या कार्यप्रकाराबाबत संबंधित विभागांकडून माहिती

मागविण्यात आली आहे. सदर माहिती अद्याप अप्राप्त असल्याने अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाच्या

सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (ब) च्या पुर्ततेच्या अनुषंगाने त्यांचे प्रकरण खुले ठेवण्याबाबत समितीने

निर्णय घेतला.

श्रीमती श्रध्दा साहेबराव सुदेवाड, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या दिनांक १९.०९.२०१६ ते

(५) दिनांक ११.०८.२०२० ( प्रमाणपत्रातील दिनांक १०.०९.२०२०) या कालावधीतील जलसंपदा ई-

प्रशासन मंडळांतर्गत कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे येथील सेवा कालावधी

आवश्यकतेनुसार कार्यकारी तसेच अकार्यकारी या दोन्ही प्रकारात गणणे उचित होईल असे मुख्य

अभियंता (स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण, पुणे यांनी दि. २७.१०.२०२३ च्या प्रमाणपत्रान्वये

प्रमाणित केले आहे. तथापि, प्रशासन संगणकीकरण विभाग, पुणे या विभागातूनच प्रत्यक्ष क्षेत्रावरील

बांधकाम होत नसल्याने त्यांचा सदर पदावरील कालावधी गट-ब मध्ये ग्राह्य धरता येत नाही. परिणामी

श्रीमती सुदेवाड यांच्या गट-ब मधील सेवा अनुभवाची पुर्तता होत नाही असा समितीने निष्कर्ष काढला.

श्री.स.म.ह.शेख, कार्यकारी अभियंता यांची दिनांक ०१.०९.२०२१ ते आजपर्यंतच्या कालावधीतील

(६) कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभागीय पथक क्र.४, आखाडा, बाळापूर येथील सेवा गट

"अ" म्हणून प्रमाणित करण्यात आली असली तरी, यापूर्वीची त्यांची सदर कार्यालयातील दिनांक

११.०७.२०१२ ते ३०.०६.२०१९ या कालावधीतील सेवा गट "ब" म्हणून प्रमाणित करण्यात आली आहे.

सदरहू कार्यालयातील कार्यप्रकार बांधकाम या गट "ब" मधील कार्यप्रकारात मोडत असल्याने मुख्य

अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी जरी

सदरहू सेवा गट "अ" म्हणून प्रमाणित केली असली तरी उक्त विभागाकडे प्रकल्प बांधकाम विषय

असल्याने सदरहू कालावधीतील सेवा गट "ब" मध्ये मोडत असल्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

(७) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांच्या अहवालानुसार, श्री.श्री.वि.हजारे, कार्यकारी

अभियंता (स्थापत्य) हे दि.०१.०३.२०१२ ते ०१.०७.२०१६ या कालावधीमध्ये सहायक कार्यकारी

अभियंता (स्थापत्य) या पदावर लघु पाटबंधारे बांधकाम उपविभाग, रिसोड, जिल्हा वाशिम येथे कार्यरत

असताना त्यांनी पाणीपट्टी वसुल केल्याची देयके प्रमाणित करुन सादर केली आहेत. तसेच, वाशिम

जिल्ह्यातील सोमठाणा ल.पा.ता.मालेगांव, जयपूर बॅरेज, कोकलगांव बॅरेज, सोणगव्हाण बॅरेज व वरुड बॅरेज या प्रकल्पांतर्गत खरीप व रब्बी हंगामाकरीता सिंचन व्यवस्थापनाची पार पाडलेली कामे तसेच प्रकल्पांतर्गत मोजणी क्षेत्रावरील प्रकल्पनिहाय पाणीपट्टी आकारणी तक्ते तयार करुन त्यास मंजूरी घेणे ही कामे केली आहेत. या कामांचा समावेश व्यवस्थापन या कार्यप्रकारात होत असून, जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि. २५.०७.२०१४ नुसार दि. २५.०७.२०१४ पासून व्यवस्थापन हा कार्यप्रकार गट - अ मध्ये समाविष्ट केला असल्याने दि.२५.०७.२०१४ ते ०१.०७.२०१६ (१ वर्ष ११ महिने ६ दिवस) हा कालावधी गट-अ मधील कार्यप्रकारामध्ये मोडत असल्याबाबत समितीने निर्णय घेतला आहे.

(८) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०२.१९९७ अन्वये परिविक्षाधीन कालावधीतील सेवा पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात यावी, असे स्पष्ट करण्यात आले असल्याने, सर्व अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी हा पदोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या सेवाप्रवेश नियमातील नियम-३ नुसार आवश्यक असणारा सेवा कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात आला. तसेच, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार दिनांक ०७.०४.२००८ पूर्वीचा महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-ब मधील अनुभवाचा कालावधीदेखील विचारात घेण्यात आला आहे. त्यानुसार समितीने पात्र/अपात्र अधिकाऱ्यांबाबत पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या :-

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | सेवाज्येष्ठता दिनांक | शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. सं.रा.भोसले | ७६ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २ | श्री. पृ.मो. फाळके | ७७ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३ | श्री. चं.के.गोडबोले | ७८ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४ | श्री. म.श्री.कदम | ७९ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ५ | श्री. अ.वि. फरकडे | ८० | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ६ | श्री. प्र.यु.झोड | ८१ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ७ | श्री. श्री.वि. हजारे | ८२ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ८ | श्री. रा. बा.गोवर्धने | ८३ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ९ | श्री. वि.हिं.पाटील | ८४ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | सेवाज्येष्ठता दिनांक | शिफारस |
|---|---|---|---|---|
| १० | श्री. प्र.व.खेडकर | ८५ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ११ | श्री. रा.रा.सोनोने | ८६ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १२ | श्रीमती र.स.देशमुख | ८७ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १३ | श्री. रो.ध. हटवार | ८८ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १४ | श्रीमती प्रि.वि.सोनार | ८९ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १५ | श्रीमती प.कौ.जगताप | ९० | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १६ | श्री.रा.ग.घोडपकर | ९१ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १७ | श्रीमती सं.रो.जगताप | ९२ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १८ | श्रीमती शि.सा.मगदूम | ९३ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| १९ | श्री.यो.वि.सोनवणे | ९४ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २० | श्री.चि. हो.धुम | ९५ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २१ | श्री.अ.ओ.सावरकर | ९६ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २२ | श्रीमती यो.सु.पुनसे | ९७ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २३ | श्रीमती श्र.सा.सुदेवाड | ९८ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) ची पूर्तता होते. तथापि, नियम ३ (ब) ची पूर्तता होत नाही |
| २४ | श्रीमती रु.द.ठोंबरे | ९९ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) ची पूर्तता होते व नियम ३ (ब) च्या पुर्ततेच्या अनुषंगाने प्रकरण खुले ठेवण्यात यावे |
| २५ | श्री.सं.ल.पाटील | १०१ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २६ | श्री.सु.गो.राठी | १०२ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २७ | श्री.वि.बा.जाधव | १०४ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | सेवाज्येष्ठता दिनांक | शिफारस |
|---|---|---|---|---|
| २८ | श्री.ना.वा.जोशी | १०५ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| २९ | श्री.दि.वा.चांदुरे | १५३ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३० | श्री.प्र.शा. कचरे | ३ | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३१ | श्री.नि.शा.दुसाने | ११० | १७.०९.२०१६ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३२ | श्री.प्र.प्रां.कडुस्कर | ११२ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३३ | श्री.स.म.ह.शेख | ११४ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३४ | श्री.प्र.र.मोरे | ११५ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३५ | श्री.ध.मा.गोडसे | ११६ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३६ | श्री.सु.पां.आडे | ११७ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३७ | श्री.र.ग.वाडकर | ११८ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ३८ | श्री.मि.आ.वाणी | ११९ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) ची पूर्तता होते व नियम ३ (ब) च्या पुर्ततेच्या अनुषंगाने प्रकरण खुले ठेवण्यात यावे |
| ३९ | श्री.स.कुं.पवार | १२० | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४० | श्री.र.प.वऱ्हाडे | १२१ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४१ | श्री.सं.रं.पाटील | १२२ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४२ | श्री.वि.पां.पाटील | १२३ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४३ | श्री.सु.ह.आयगोळे | १५० | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |
| ४४ | श्री.सं.स.पांडे | १५४ | ०१.०४.२०१७ | से.प्र.नियमातील नियम ३ (अ) व (ब) ची पूर्तता होते |

६. विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी श्रीमती रुपाली द.ठोंबरे आणि श्री. मिलींद आ.वाणी यांच्या बाबतीत अन्य विभागातील सेवेच्या कार्यप्रकाराबाबत मागविण्यात आलेली अधिकची माहिती प्राप्त होईपर्यंत त्यांचे प्रकरण खुले ठेवण्याचा समितीने निर्णय घेतला.

७. जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०१.०७.२०२० नुसार कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर कार्यरत असलेल्या व पुढील ३ वर्षामध्ये अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीच्या विचारकक्षेत येणाऱ्या अधिकाऱ्यांचा अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नतीकरीता विहित करण्यात आलेला गट-अ व गट-ब मधील कालावधी पूर्ण झाला नसेल तर त्यानुसार प्रकरणपरत्वे गट-अ/गट-ब पदावर नियुक्ती मिळण्यासाठी विनंती अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, सदरहू परिपत्रकामध्ये अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहित अनुभवाचा कालावधी पूर्ण होत नसल्यास त्यास संबंधित अधिकारी स्वत: जबाबदार राहतील असे देखील सूचित करण्यात आले आहे. तथापि, श्रीमती श्र.सा.सुदेवाड यांनी स्वत: विनंती अर्ज करुन पदोन्नती/बदलीच्या पदस्थापनेसाठी शिफारस घेतली असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावरील पदोन्नतीसाठी सेवाप्रवेश नियमातील अटींची पूर्तता होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी गट-अ व गट-ब मधील सेवेच्या कामकाजाचा अनुभव प्राप्त करुन घेणे आवश्यक असून, अनुभवाची पूर्तता होत नसल्यास त्यास संबंधित अधिकारी स्वत: जबाबदार आहेत. यास्तव, श्रीमती श्र.सा. सुदेवाड यांचा अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाच्या सेवाप्रवेश नियमातील नियम-३ मधील तरतूदीनुसार गट "ब" मधील सेवेच्या किमान अनुभवाचा निकष पूर्ण होत नाही. यास्तव समिती श्रीमती सुदेवाड, का.अ (स्था) यांची गट "ब" मधील कार्यप्रकारातील कार्यालयात बदलीने पदस्थापना करण्याची शिफारस देखील करीत आहे.

८. श्रीमती ठोंबरे, श्रीमती सुदेवाड आणि श्री. वाणी हे अधिकारी वगळता इतर सर्व अधिकारी गट-अ व गट-ब मधील किमान ३ वर्षाच्या सेवेच्या अनुभवाचा निकष पूर्ण करीत आहेत.

(राखी स. चव्हाण)
अवर सचिव (सेवा)
सदस्य सचिव

(उ.र.दहिफळे)
उप सचिव (सेवा)
सदस्य

(अ.वि.देवकाते)
उप सचिव (प्रशा)
सदस्य

(ल.पाठक)
मुख्य अभियंता तथा
सह सचिव (द व प्र)
सदस्य

(सं.म.बेलसरे)
सचिव (प्रकल्प समन्वय)
(अतिरिक्त कार्यभार)
सदस्य

(सं.म.बेलसरे)
सचिव (लाक्षेवि)
अध्यक्ष

1-1

सार्वजनिक बांधकाम विभाग/सेवा ५

पृ. ९ /प. वि. वरील जलसंपदा विभाग, कार्यासन आ. (वर्ग-१) यांचे टिप्पणीस अनुसरून सादर

१. जलसंपदा विभागाने उपरोक्त नमूद टिप्पणीद्वारे पुढील नमूद बाबी विचारात घेऊन श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता यांचा सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ या पदाचा सेवा अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००८, दिनांक ०७/०४/२००८ ची अधिसूचना व शासन निर्णय, दि. २५/०७/२०१४ नुसार पुढे नमूद गटातील कोणत्या कार्यप्रकारात मोडतो याबाबत अभिप्राय देण्याची विनंती केली आहे.

२.१ जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या वरिष्ठ संवर्गात सन २०२३-२४ या निवडसूची वर्षात पदोन्नती देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. सदर निवडसूची वर्षात श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता पदोन्नतीकरिता विचारक्षेत्रात असून त्या खालील कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागात सहायक अभियंता श्रेणी-१ पदावर कार्यरत होत्या-

१. दि. ०१/१०/२००८ ते दि. २६/०५/२०११ : मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर

२. दि. २७/०५/२०११ ते दि. १३/०६/२०१२ : मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण), उप विभाग, लातूर.

२.२ महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-अ मधील अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम २००८, दि. ०७/०४/२००८ च्या अधिसूचनेमधील नियम ३ नुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट-अ मध्ये असताना पुढील दोन गटांपैकी प्रत्येक गटातील कोणत्याही एका किंवा अधिक शाखांतील कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असला पाहिजे-

(अ) (एक) संशोधन,

(दोन) संकल्पचित्र,

(तीन) प्रकल्प तयार करणे,

(चार) अन्वेषण किंवा,

(पाच) प्रशिक्षण कार्य किंवा,

(सहा) या सोबतच्या परिशिष्ट मध्ये उल्लेखित कार्यालयातील गट-अ मधील कोणत्याही पदावर केलेली सेवा.

(ब) (एक) बांधकाम किंवा,

(दोन) व्यवस्थापन

२.३ तथापि, आता विभागाच्या शासन निर्णय दि. २५/०७/२०१७ नुसार दि. ०७/०४/२००८ च्या शासन अधिसूचनेमधील नियम ६ मधील "व्यवस्थापन" या कार्यप्रकाराचा समावेश गट-ब ऐवजी गट-अ मध्ये करण्यात आला आहे.

1-2 266

३.	सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात सहायक अभियंता श्रेणी-१ म्हणून मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग,लातूर व मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण), उप विभाग, लातूर या ठिकाणी कार्यरत होत्या. सदरहू पदे अकार्यकारी स्वरूपाची पदे आहेत. सदर वस्तुस्थितीच्या अनुषंगाने श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ पदाची सेवा अधीक्षक अभियंता (स्थापत्य)(सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २००८ दि. ०७/०४/२००८ ची अधिसूचना व शासन निर्णय, दि. [illegible]/२०१४ नुसार गट-अ कार्यप्रकारात मोडते.

४.	उपरोक्त परिच्छेद क्र. ३ येथे नमूद केल्याप्रमाणे या विभागाचे अभिप्राय जलसंपदा विभागास उपलब्ध करून देण्यात यावे असे आहे.

२०/०२/२०२४

का.अ. (श्री. बसगोंडे)
२०/०२/२४

अ.स.(प्रशा)(श्री. खारके)
२०/०२/२०२४

स.स.(सेवा)(श्रीम. पालकर)
०९/०२/२०२४

उ.स.(सेवा)(जलसंपदा विभाग)

श्री [illegible]
०९/०२/२०२४

क्र.एसएलएस १२२४/५५/आस्था.१) 103

जलसंपदा विभाग / आ.(वर्ग-१)

पूर्व पृष्ठावरील टिप्पणीस अनुलक्षून सादर,

२. जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या वरिष्ठ संवर्गात सन २०२३-२४ या निवडसूची वर्षात पदोन्नती देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. सदर निवडसूची वर्षात श्रीमती रुपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता पदोन्नतीकरिता विचारक्षेत्रात असून, त्या खालील कालावधीत सार्वजनिक बांधकाम विभागात सहायक अभियंता श्रेणी-१ या पदावर कार्यरत होत्या :

१. दि.०१.१०.२००८ ते दि.२६.०५.२०११ : मार्ग प्रकल्प विभाग, लातुर अंतर्गत मार्ग प्रकल्प, उपविभाग, लातुर

२. दि.२७.०५.२०११ ते दि.१३.०६.२०१२ : मार्ग प्रकल्प विभाग, लातुर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण), उपविभाग, लातुर

३. अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदाचे दि.०१ मार्च, १९९६ रोजीचे सेवाप्रवेश नियम, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २००८ व जलसंपदा विभाग, शासन निर्णय, दिनांक २५.०७.२०१४ नुसार, श्रीमती रुपाली ठोंबरे यांच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालीन सेवा गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्यप्रकारात मोडते याबाबत आपले स्पष्ट अभिप्राय दि.०६.०३.२०२४ रोजीच्या टिप्पणीन्वये मागविण्यात असून, सदर अभिप्राय या विभागास अद्याप अप्राप्त आहेत. अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून, सदर प्रकरणी आपले अभिप्राय तात्काळ देण्याबाबत पुनश्च: विनंती करण्यात येत आहे.

क.अ. (श्री.परब)

अ.स. (सेवा / श्रीम.चव्हाण) 15/04/2024

उ.स. (सेवा / श्री. दहिफळे) 16/04/2024

स.स. (सा.बां.वि.) (श्रीमती भालेकर)

204
104

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूर्वपृष्ठावरील टिप्पणीस अनुसरून सादर. जलसंपदा विभाग/आ(वर्ग १)

२. जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर सन २०२३-२४ या निवडसूची वर्षातून पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात असलेल्या श्रीमती रुपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) या पदावरील सेवा अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाचे दिनांक ०१.०३.१९९६ च्या अधिसूचनेन्वये (पृष्ठ३-४/प.वि.) विहित करण्यात आलेल्या तसेच दिनांक ०७.०४.२००८ ची अधिसूचना (पृष्ठ ५-७/प.वि.) व दिनांक २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये (पृष्ठ ९-१०/प.वि.) सुधारित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार विशिष्ट गटातील कोणत्या कार्यप्रकारात मोडते याबाबत अभिप्राय देण्याची विनंती दिनांक २८.०२.२०२४ च्या टिप्पणीन्वये (पृष्ठ १-२/प.वि.) सार्वजनिक बांधकाम विभागास करण्यात आली असता, सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्वपृष्ठावरील टिप्पणीन्वये श्रीमती ठोंबरे सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) म्हणून कार्यरत असलेली सार्वजनिक बांधकाम विभागातील मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर व मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण), उपविभाग, लातूर येथील पदे अकार्यकारी स्वरुपाची पदे असून त्यांची सेवा गट-अ कार्यप्रकारात मोडते असे अभिप्राय दिनांक ०१.०२.२०२४ च्या टिप्पणीन्वये दिले आहेत.

३. येथे स्पष्ट करण्यात येते की, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाचे दिनांक ०१.०३.१९९६ च्या अधिसूचनेन्वये विहित करण्यात आलेल्या तसेच दिनांक ०७.०४.२००८ ची अधिसूचना व दिनांक २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये कार्यकारी अथवा अकार्यकारी असा शब्दप्रयोग करण्यात आलेला नसून विभागातील शाखांचे गट-अ व गट-ब मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार श्रीमती ठोंबरे यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालिन सेवा गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्यप्रकारात मोडते याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्याबाबत पुनःश्च सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती करण्यात यावी.

०६.०३.२०२४
क.अ.(श्री.परब)

अ.स.(सेवा)(श्रीमती चव्हाण) 06/03/2024

उ.स.(सेवा)(श्री.दहिफळे) 07/03/2024

स.स.(सेवा)(श्रीमती भालेकर)

क्र. : संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ७८/सेवा-२

सार्वजनिक बांधकाम विभाग/सेवा-२

सादर,

२. जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातून अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या पदावर सन २०२३-२४ या निवडसूची वर्षातून पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात असलेल्या श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) या पदावरील सेवा अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाचे दि. ०१.०३.१९९६ च्या अधिसूचनेन्वये विहित करण्यात आलेल्या तसेच दिनांक ०७.०४.२००८ ची अधिसूचना व दिनांक २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार विशिष्ट गटातील कोणत्या कार्यप्रकारात मोडते याबाबत जलसंपदा विभाग, कार्यासन आ(वर्ग-१) यांनी पृ. ७ /टि वि. वरील टिप्पणीन्वये विनंती केली होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे जलसंपदा विभागास अभिप्राय देण्यात आले होते-

"श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागात सहायक अभियंता श्रेणी-१ म्हणून मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग,लातूर व मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण), उप विभाग, लातूर या ठिकाणी कार्यरत होत्या. सदरहू पदे अकार्यकारी स्वरूपाची पदे आहेत. सदर वस्तुस्थितीच्या अनुषंगाने श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे, कार्यकारी अभियंता यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ पदाची सेवा अधीक्षक अभियंता (स्थापत्य)(सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २००८ दि. ०७/०४/२००८ ची अधिसूचना व शासन निर्णय, दि. २५/०७/२०१४ नुसार गट-अ कार्यप्रकारात मोडते."

३. तदनंतर, जलसंपदा विभागाने अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदाचे दि. ०१.०३.१९९६ च्या अधिसूचनेन्वये विहित करण्यात आलेल्या तसेच दिनांक ०७.०४.२००८ ची अधिसूचना व दिनांक २५.०७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सुधारित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये कार्यकारी अथवा अकार्यकारी असा शब्दप्रयोग करण्यात आलेला नसून विभागातील शाखांचे गट-अ व गट-ब मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार श्रीमती ठोंबरे यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालिन सेवा गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्यप्रकारात मोडते याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्याची विनंती पृ. ५ /टि. वि. वरील टिप्पणीन्वये केली होती. आता, जलसंपदा विभागाने अधीक्षक अभियंता(स्थापत्य) पदावरील पदोन्नतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून, सदर प्रकरणी तात्काळ अभिप्राय देण्याची विनंती पृ.७ /टि. वि. वरील टिप्पणीन्वये केली आहे.

४. विभागांतर्गतील उप अभियंता संवर्गातील पदांचे कार्यकारी व अकार्यकारी पदे असे शासनस्तरावर वर्गीकरण करण्यात आले नसल्यामुळे सदर प्रकरणी जलसंपदा विभागास अभिप्राय देण्याच्या अनुषंगाने, शासन पत्र

दि. १८/०३/२०२४ अन्वये श्रीमती [illegible] ढोबे यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालीन सहायक अभियंता [illegible]
पदावरील मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर येथील दि. ०१/१०/२००८ ते
२६/०५/२०११ या कालावधीमधील व मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण) [illegible]
विभाग, लातूर येथील दि. २७/०५/२०११ ते १३/०६/२०१२ या कालावधीमधील सेवा ही गट-अ व गट-ब यापैकी कोणत्या
कार्यप्रकारात मोडते याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
नांदेड व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छ. संभाजीनगर यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छ. संभाजीनगर यांनी दि. २८/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये
पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

| अ.क्र. | विभाग व उप विभाग | कालावधी | सेवेचा कार्यप्रकार गट-अ/गट-ब |
|---|---|---|---|
| १ | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर | दि. ०१/१०/२००८ ते २६/०५/२०११ | गट-अ |
| २ | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण) उप विभाग, लातूर | दि. २७/०५/२०११ ते १३/०६/२०१२ | गट-अ |

५. सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छ. संभाजीनगर यांनी सदरहू प्रकरणी दिलेले अभिप्राय विचारात घेता, "श्रीमती रुपाली दगडू ढोबे यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक अभियंता श्रेणी-१ पदावरील दि. ०१/१०/२००८ ते दि. १३/०६/२०१२ या कालावधीमधील सेवा ही "गट-अ" कार्यप्रकारात मोडते."

६. याखव सदरहू प्रकरणी उपरोक्त परि. ५ येथे नमूद केल्याप्रमाणे या विभागाचे अभिप्राय जलसंपदा विभागास उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

कक्ष अ. (श्री. [illegible])

अ.स.(प्रक्री)(श्री [illegible])

स.स.(सेवा)(श्रीम. [illegible])

सचिव (बांधकाम)(श्री [illegible])

सचिव (ला.क्षे.वि.)([illegible])

57
२७२

२७२

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), चौथा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२ २२०४७६३४
Email ID : dosev2.pwd@maharashtra.gov.in

क्रमांक :- संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ७८/सेवा-२

दिनांक :- १८/०३/२०२४.

प्रति,
मुख्य अभियंता
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
नांदेड / छ. संभाजीनगर

**विषय :- पदांच्या कार्यप्रकाराबाबतची माहिती उपलब्ध करून देणेबाबत...**
**संदर्भ :-** जलसंपदा विभाग, शासन अधिसूचना, दिनांक ०७/०४/२००८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, श्रीमती रुपाली दगडू ठोंबरे या सार्वजनिक बांधकाम विभागात सहायक अभियंता श्रेणी-१ या पदावर आपल्या अधिनस्त खालील विभागात कार्यरत होत्या.

| अ.क्र. | विभाग व उप विभाग | कालावधी |
|---|---|---|
| १. | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर | दि. ०१/१०/२००८ ते २६/०५/२०११ |
| २. | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण) उप विभाग, लातूर | दि. २७/०५/२०११ ते १३/०६/२०१२ |

२. वरील संदर्भाधीन अधिसूचनेन्वये जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या सन १९९६ च्या सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून उक्त नियमातील नियम ६ मध्ये जलसंपदा विभागातील शाखांचे गट-अ व गट-ब मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.) त्यानुसार श्रीमती ठोंबरे यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील तत्कालिन सहायक अभियंता श्रेणी-१ पदावरील वरील कालावधीमधील सेवा ही गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्यप्रकारात मोडते? याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय त्वरीत देण्यात यावेत, ही विनंती.

२८/०३/२४
(रविंद्र पु. वराणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र – वरीलप्रमाणे

प्रत,
निवडनस्ती कार्यासन सेवा-२

८०३।३११२-२ (न.प.) 108
२९।४।२०२४ 273

महाराष्ट्र शासन
मुख्य अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग
"बांधकाम भवन" स्नेहनगर, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५.

Phone No.: (०२४०)२३३१६१६, २३३१८१५ E-Mail : aurangabad.ce@mahapwd.gov.in

जा.क्र.मुअछस/का-४/राआ/ 1754

प्रति,

दिनांक : 18 APR 2024

कार्यासन अधिकारी (सेवा-२)
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय-मुंबई

विषय :- पदांच्या कार्यप्रकाराबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :- १.शासन पत्र क्र.सकांणं-२०२४/प्र.क्र.७८/सेवा-२/दिनांक ०१.०४.२०२४
२.अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, धाराशीव यांचे पत्र क्र.साबांमंधा/आस्था-१/२८५७/दि. १२.०४.२०२४

संदर्भीय शासन पत्रान्वये श्रीमती रुपाली दगडु ढोंबरे तत्कालीन सहाय्यक अभियंता श्रेणी-१ यांची मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर येथील दि. ०१.१०.२००८ ते २६.०५.२०११ व विशेष प्रकल्प (दक्षता व गुणनियंत्रण), उप विभाग, लातूर दि. २७.०५.२०११ ते १३.०६.२०११ या कालावधीतील सहाय्यक अभियंता श्रेणी-१ या पदावरील सेवा ही गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्य प्रकारात मोडते याबाबत अभिप्राय सादर करण्याचे सुचित केले आहे.

त्यानुसार संदर्भ-२ अन्वये अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, धाराशीव यांनी शासन जलसंपदा विभागाच्या दिनांक ०७.०८.२००८ अधिसुचनेतील नियम ६ नुसार श्रीमती रुपाली दगडु ढोंबरे, तत्कालीन सहाय्यक अभियंता श्रेणी-१ यांची सेवाविषयक कार्यप्रकार बाबत खालील प्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे.

| अ.क्र. | विभाग व उपविभाग | कालावधी | सेवेचा कार्य प्रकार गट-अ /गट-ब |
|---|---|---|---|
| १ | मार्ग प्रकल्प विभाग, लातुर अंतर्गत मार्ग प्रकल्प उप विभाग, लातूर | दि.०१.१०.२००८ ते २६.०५.२०११ | गट-अ |
| २ | मार्ग प्रकल्प विभाग, लातुर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुणनियंत्रण) उप विभाग, लातूर | दि.२७.०५.२०११ ते १३.०६.२०११ | गट-अ |

तरी मंडळाने सादर केलेल्या अभिप्रायास या कार्यालयाची सहमती आहे.

सोबत :- वरील प्रमाणे

१८/४/२४
(श्रीनिवास र.कातकडे)
मुख्य अभियंता

प्र.उ.
२२।०४।२४

१९

महाराष्ट्र शासन

# अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय

सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव
बांधकाम भवन, समतानगर, धाराशिव-४१३ ५०१

[illegible] | E-mail - [illegible] | Fax No. [illegible]

जावक क्र. [illegible]

दिनांक : 12 APR 2024

प्रति,
मुख्य अभियंता
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.

विषय :- पदांच्या कार्यप्रकाराबाबतची माहिती उपलब्ध करून देणे बाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक :- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७८/सेवा-२ दिनांक १८/०३/२०२४.
२) मुख्य अभियंता सा.बां. प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे दूरध्वनी संदेश दि. ०१/०४/२०२४

.......oo.......

प्रस्तुत प्रकरणी संदर्भीय शासन पत्रान्वये श्रीमती रूपाली दगडू ठोंबरे यांची तत्कालीन सहाय्यक अभियंता श्रेणी-२ या [illegible] मंडळांतर्गत कार्यरत असताना खालील कालावधीची सेवा ही जलसंपदा विभाग शासन अधिसूचना दिनांक [illegible]२००८ मधील तरतुदीनुसार गट-अ व गट-ब मधील कोणत्या कार्य प्रकारात मोडते याबाबत माहिती मागविण्यात आली.

[illegible] जलसंपदा विभाग शासन शासन अधिसूचना दिनांक ०७/०४/२००८ मधील तरतुदींनुसार श्रीमती रूपाली दगडू तत्कालीन सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांची मागविण्यात आलेली सेवाविषयक कार्य प्रकाराची माहिती खालील प्रमाणे उपलब्ध करून देत आहे.

| अ.क्र. | विभाग व उपविभाग | कालावधी | सेवेचा कार्य प्रकार गट-अ/ गट-ब |
|---|---|---|---|
| १ | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत मार्ग प्रकल्प उपविभाग लातूर | ०१/१०/२००८ ते २६/०५/२०११ | गट-अ |
| २ | मार्ग प्रकल्प विभाग, लातूर अंतर्गत विशेष प्रकल्प (दक्षता व गुण नियंत्रण) उपविभाग, लातूर | २७/०५/२०११ ते १३/०६/२०१२ | गट-अ |

(बा.मा. थोरात)
अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव

"डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष -2015"

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग,

Web: www.wrd.maharashtra.gov.in

क्र. संकीर्ण २०१५/(२३१/१५)/लपा-१

जलसंपदा विभाग
हुतात्मा राजगुरु
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:-१२/१०/२०१५

प्रति,
अधीक्षक अभियंता
कोयना संकल्पचित्र मंडळ,
पुणे

| | |
|---|---|
| विषय:- | जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत |
| संदर्भ:- | १) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-०४१२ / (१८९/२०१२) / (भाग-१) / मोप्र-१ दि .९/८/२०१२<br>२) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. ई-प्रशासन२०१३ / (२७ / १३) / लपा-१, दि .१२/०३/२०१३<br>३) दि. १७/०६/२०१५ रोजी मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय यांनी घेतलेल्या आढावा सभेदरम्यान दिलेले निर्देश<br>४) अधीक्षक अभियंता, कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांचे पत्र क्र. पी.एम.ओ./D-४/धा-१२७/११९८/२०१५ दिनांक:-३०/०६/२०१५ |

1) संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये जलसंपदा विभागाच्या ई-प्रशासन कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाची (PMO) स्थापना करण्यात आली आहे.
2) संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये रु. दहा लक्ष पेक्षा जास्त व रु. पाच कोटीपेक्षा कमी किंमतीच्या ई-प्रशासन प्रकल्पांस मान्यता देण्याकरिता जलसंपदा विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय मार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना अशा समितीची मान्यता घेण्यात येते.
3) जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या स्थापत्य विषयक कामांना महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देऊन सदर प्रकल्पांचे काम पुर्ण करण्यात येते. सद्यस्थितीत ई-प्रशासन विषयक कामांच्या बाबतीत देखील महाराष्ट्र बांधकाम नियमपुस्तिका, १९८४ व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश, योग्य असेल त्यानुसार वेळोवेळी काम करण्यात आले आहे. तथापि, सदर आदेश हे स्थापत्य विषयक कामांशी संबंधित असल्याने ई-प्रशासन विषयक प्रकल्पांच्या बाबतीत कामाच्या स्वरुपाशी सुसंगत असे आदेश निर्गमित व्हावेत याबाबत संदर्भ क्र. ३ मध्ये नमुद बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली होती. याअनुषंगाने मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग यांनी याबावत आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश दिले होते.
4) संदर्भ क्र. ४ अन्वये कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांनी ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दतीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. या कार्यपध्दतीमध्ये खालील बाबींचा समावेश असुन, सविस्तर कार्यपध्दत सोबत मंजुर करुन जोडण्यात येत आहे-

| | |
|---|---|
| १. | ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करणे |
| २. | विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee) |
| ३. | प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे |
| ४. | प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे |
| ५. | यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे |
| ६. | केलेल्या कामाची देयके देणे |
| ७. | Change Request मंजुर करणे |
| ८. | सुधारीत प्रशासकीय मान्यता |
| ९. | पुर्णत्व अहवाल |
| १०. | प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण |
| | |

5) सदर तरतुदी प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत यानंतर हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांना लागु राहतील. जे प्रकल्प सद्यस्थितीत विकसनाच्या टप्प्यावर आहे व ज्यांना या कार्यपध्दतीमधील अ.क्र. (२) मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्यता मिळालेली आहे, त्यांना अ.क्र. (४) नुसार तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता राहणार नाही. अशा प्रकल्पांच्या बाबतीत अ.क्र. (२) अन्वये प्रदान केलेली मान्यता हीच तांत्रिक मान्यता समजण्यात यावी. तथापि, अशा प्रकल्पांना अ.क्र. (३) नुसार नमुद केलेली प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विहित कार्यपध्दतीमधील अ.क्र. (६) ते (१०) या तरतुदी देखील आवश्यक त्या फेरफारांसह लागु राहतील.

6) ई-प्रशासन प्रणालीविषयक कार्यवाही करताना या सुचनांचा अवलंब करण्यात यावा, व याबाबत कोणतीही अडचण असल्यास, त्याबाबत शासनास स्वतंत्र संदर्भ करण्यात यावा.

(डॉ. संजय बेलसरे)
शासनाचे उपसचिव

सहपत्र:- जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती

# जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन प्रकल्प राबविण्याची कार्यपध्दती

जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पत्र क्र. ____________, दि. /09/2015 चे सहपत्र

कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या ई-प्रशासन प्रकल्पांची कार्यपध्दती खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे. त्यामध्ये खालील 10 बाबींचा समावेश आहे-

(I) **ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करणे**
(II) **विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee)**
(III) **प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे**
(IV) **प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे**
(V) **यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे**
(VI) **केलेल्या कामाची देयके देणे**
(VII) **Change Request मंजुर करणे**
(VIII) **सुधारीत प्रशासकीय मान्यता**
(IX) **पुर्णत्व अहवाल**
(X) **प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण**

सविस्तर कार्यपध्दती खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे-

(I) **ई-प्रशासन प्रणाली राबविणेबाबत संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करणे**

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 29/10/2001 च्या शासन निर्णयातील अ.क्र. 2.1 नुसार संगणकीकरणाच्या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक जबाबदारी ही त्या त्या प्रशासनिक विभागाची असेल असे निर्देश देण्यात आले आहेत. या अनुषंगाने जलसंपदा विभागांतर्गत ई-प्रशासन विषयक प्रकल्पांचे नियोजन व अंमलबजावणी करणे यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे (Project Management Office, Pune) या कार्यालयाची स्थापना दि. 9/8/2012 रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. या कार्यालयामार्फत विभागाच्या गरजेनुरुप तसेच शासनाच्या आदेशानुसार ई-प्रशासन प्रकल्पांची आखणी करुन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांना खालील पध्दतीने प्रस्ताव प्राप्त होऊ शकतात-

1) जलसंपदा विभागाकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प
2) जलसंपदा विभागाच्या आवश्यकतेनुसार व Vision २०२० मधील ई-प्रशासनावरील अहवालाच्या अनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत प्रस्तावित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प
3) जलसंपदा विभागातील कोणत्याही कार्यालयाकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प
4) केंद्र शासन किंवा DeitY यांचेकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प
5) राज्य शासन किंवा माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडुन निर्देशित करण्यात येणारे ई-प्रशासन प्रकल्प

अशा प्रकारे प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या प्रत्येक कामाची स्वतंत्र असणारी संकल्पना टिप्पणी (Concept Note) तयार करावी. सदर टिप्पणीस प्रथमत: जलसंपदा विभागाची तत्वत: मंजुरी घेण्यात यावी. सदर

113

| | |
|---|---|
| | टिप्पणीमध्ये खालील बाबींचा समावेश करावा-<br>**1) सर्वसाधारण टिप्पणी:**<br>i) प्रकल्पाचे प्रस्तावित नाव<br>ii) प्रकल्प कोणी प्रस्तावित केला<br>iii) प्रकल्पाची आवश्यकता<br>iv) यापुर्वी अशा प्रकारचा प्रकल्प राबविण्यात आला होता काय? असल्यास त्याची सद्यस्थिती<br>v) प्रस्तावित प्रकल्पापासुन मिळणारे फायदे<br>vi) प्रकल्पाची घटक / उप-घटक / मोड्युल्स : ई-प्रशासन प्रणालींचे घटकनिहाय विकसन करुन नंतर त्यांची जोडणी (integration) करणे शक्य असल्याने गरजेनुरुप छोट्या स्वरुपात कामे हाती घेण्यात यावी, व अशी कामे पुर्ण करुन त्यांची जोडणी करण्यात यावी.<br>vii) तांत्रिक रचना (Architecture)<br>viii) प्रकल्पासाठी आवश्यक Software / hardware / connectivity व त्यांची मालकी (proprietary) बाबतचा तपशिल<br>ix) गरजेनुरुप तांत्रिक सल्लागार / DIT / NIC / Mahaonline आदींनी दिलेला सल्ला<br>x) प्रकल्प राबविण्यासाठी उपलब्ध असलेले संभाव्य पर्याय<br>xi) इतर ई-प्रशासन प्रकल्पांसोबत जोडणीबाबतचे धोरण<br>xii) परीवर्तन व्यवस्थापन व मनुष्यबळ क्षमता उभारणीसाठी (Change Management & Capacity Building) आवश्यक असलेली उपाययोजना<br>xiii) प्रकल्पांची परिसिमा (Limitation)<br>**2) कालावधी:-**<br>i) प्रकल्पाचे नियोजन करुन मान्यता मिळण्यासाठी लागणारा संभाव्य कालावधी<br>ii) प्रकल्पाची अंमलबजावणी करुन तो उपलब्ध करुन (Go Live)देण्यासाठी लागणारा कालावधी<br>iii) प्रकल्पाचा वापराचा कालावधी (मर्यादित कालावधीसाठी आहे कि अमर्याद कालावधीसाठी आहे याचा तपशिल)<br>iv) प्रकल्प समाप्ती<br>**3) प्रकल्प राबविण्याची प्रस्तावित केलेली यंत्रणा:-**<br>i) राज्य शासनाचा माहिती व तंत्रज्ञान विभाग<br>ii) महाऑनलाईन लिमिटेड<br>iii) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC)<br>iv) महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लीकेशन सेंटर, नागपुर (MRSAC)<br>v) केंद्र / राज्य शासनाच्या अखत्यारित असलेली अथवा शासनाचा हिस्सा / सहभाग असलेली संस्था अथवा कंपनी<br>vi) / राज्य शासन यांचेमान्यतेनुसार दर-करार मार्फत खरेदी<br>vii) माहिती व तंत्रज्ञान विभागाद्वारे empaneled केलेल्या संस्था / कंपन्या<br>viii) Proprietary प्रणाली असल्यास, सदर प्रणाली उपलब्ध करुन देणारी संस्था<br>ix) निविदा (RFP / e-Tender) द्वारे यंत्रणेची निवड करणे<br>**4) प्रकल्प राबविण्याची यंत्रणा निश्चित करण्यासाठीचा निकष:-**<br>i) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (i) ते (vi) यांचेमार्फत प्रणाली विकसित करणे, Man-Ma Basis वर मनुष्यबळ पुरविणे, Cloud पध्दतीने सेवा उपलब्ध करुन देणे इ. स्वरुपाची प्रस्तावित असल्यास, कोणत्याही निविदेची आवश्यकता नाही. संबंधित संस्थेकडुन होणारा प्रस्ताव गृहित धरण्यात यावा. सदर प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्या विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची अथवा उच्चाधिकार समितीची म घेण्यात यावी व संबंधित यंत्रणेसोबत करारनामा करण्यात यावा.<br>ii) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (vii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित अस सदर प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलब |

114

समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर दि. 29/01/2001 रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार मर्यादित निविदा पध्दतीचा अवलंब करावा.

iii) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (viii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित असल्यास, संबंधित संस्थेकडुन प्राप्त होणाऱ्या प्रस्तावास जलसंपदा विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्यात यावी.

iv) उपरोक्त अ.क्र. 3 मधील (ix) मार्फत कामे विकसित करणे प्रस्तावित असल्यास, खाली (V) **"यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे"** मध्ये दिलेल्या निर्देशांप्रमाणे कार्यवाही करावी. यामध्ये Item-Rate पध्दतीने काम करणे प्रस्तावित असल्यास (जसे- हार्डवेअर खरेदी, proprietary software खरेदी, इ.), प्रथमत: अशा प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी. जर केंद्र शासनाच्या DeitY यांनी निर्देशित केलेल्या कोणतेही प्रारुप RFP अथवा प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या Bid Document यामार्फत काम करणे प्रस्तावित असेल तर अशा प्रस्तावाची तपासणी माहिती व तंत्रज्ञान संचालनालय मार्फत करण्यात यावी व त्यानंतर अशा प्रस्तावास खाली (II) मध्ये दर्शविल्याप्रमाणे विभागाची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची अथवा उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यात यावी.

5) **प्रकल्पाचा संभाव्य खर्च**

अ) खर्चाचा घटकवार तपशिल

i) प्रणाली विकसन (Development)

ii) प्रणालीचे व्यवस्थापन व निर्वाह (Maintenance & Sustenance)

iii) क्षमता उभारणी (Capacity Building)

आ) प्रस्तावित केलेले दर कशावर आधारीत आहे याचा तपशिल

इ) पहिल्या वर्षी लागणारा खर्च

ई) त्या नंतरच्या प्रत्येक वर्षी लागणारा खर्च

उ) प्रकल्पाचा खर्च कोणत्या शिर्षामधुन प्रस्तावित आहे

उपरोक्त प्रस्ताव तयार करताना विविध प्रकल्प घटकांचे / बाबींचे /मनुष्यबळांचे दर ठरविताना केंद्र / राज्य शासनाने मंजुर केलेले दरकरार उपरोक्त अ.क्र. 3 मधील (i) ते (vi) मार्फत प्राप्त होणारे दर किंवा प्रचलित पध्दतीने बाजारातुन मागविण्यात आलेले दर यांच्या आधारे संकल्पना टिप्पणी तयार करण्यात यावी. तसेच सदरील टिप्पणी तयार करताना, आवश्यकता भासल्यास प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी नोंदणीकृत संस्थांकडुन (Empaneled Agencies) प्रस्ताव मागवावा. तसेच इतर विभागात राबविण्यात येणाऱ्या ई-प्रशासन प्रणालींचा आधार घेण्यात यावा.

जी कामे बाह्य सहाय्य (Externally Funded) प्रकल्पांतर्गत करावयाची आहेत, त्या कामांच्या अटी विचारात घेऊन या निर्देशांमध्ये दिलेल्या सुचना योग्य त्या फेरफारासह लागु राहतील.

(II) **विभागाची, प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee), उच्चाधिकार समितीची मान्यता (High Power Committee)**

उपरोक्त अ.क्र. 1 मध्ये नमुद केल्यानुसार प्रकल्पांच्या संकल्पना टिप्पणीस जलसंपदा विभागाने मान्यता प्रदान केल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 29/10/2001 तसेच जलसंपदा विभागाच्या दि. 12/03/2013 रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीची अथवा प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता घेण्यात यावी.

| प्रकल्पाची किंमत | ई-प्रशासन प्रकल्पांच्या अंमजबजावणीसाठी मान्यता देणे |
|---|---|
| रु. 10 लक्ष पर्यंत | जलसंपदा विभाग |
| रु. 10 लक्ष ते 5 | जलसंपदा विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समिती |

| | |
|---|---|
| कोटी पर्यंत | |
| रु. 5 कोटी पेक्षा अधिक | उच्चाधिकार समिती |

**(III) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे**

उपरोक्त (II) नुसार मान्यता प्राप्त झाल्यानंतर जलसंपदा विभागामार्फत अशा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येईल. प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत हात असलेल्या कामांची व्याप्ती व त्यासाठी उपलब्ध असणारे मनुष्यबळ यांचा विचार करुन नवीन काम प्रस्तावित करावे. आवश्यकता भासल्यास, शासनाकडुन मनुष्यबळ उपलब्ध करुन दिले जाईल. दि. 18 जुन 2010 रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागांन त्यांच्या अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अर्धा टक्का निधी ई-प्रशासन प्रकल्पांकरिता वापरावा अस निर्देश देण्यात आलेले आहेत. या अनुषंगाने नवीन काम हाती घेण्यापुर्वी चालु असलेल्या कामांची अद्ययावत किंमत ही उपलब्ध असलेल्या अनुदानाच्या तिप्पटीपेक्षा जास्त नसेल याची खात्री प्रशासकीय मान्यता प्रदान करतेवेळी करण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रशासकीय मान्यता देताना आर्थिक निकषांनी अट (उदा.- लाभ-व्यय गुणोत्तर अथवा परताव्याचा दर आदी) अनिवार्य असणार नाही.

**(IV) प्रकल्पास तांत्रिक मान्यता देणे**

उपरोक्त (III) नुसार प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत अशा प्रस्तावास तांत्रिक मान्यता देणेकरिता प्रस्ताव तयार करण्यात येईल व अशा प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, 1984 तसेच तदअनुषंगाने निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार असतील सद्यस्थितीत हे अधिकार खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र. | प्रकल्पाची किंमत (प्रत्येक वर्षाची किंमत) | तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| 1) | एकुण किंमत रु. 25 लक्ष पर्यंत | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे येथील कार्यकारी अभियंता |
| 2) | एकुण किंमत रु. 25 लक्ष पेक्षा जास्त व रु. 62.5 लक्ष पेक्षा कमी | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे ज्या कार्यालयाचे अधिपत्याखाली आहे ते अधीक्षक अभियंता |
| 3) | एकुण किंमत रु. 62.5 लक्ष पेक्षा जास्त | प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे ज्या कार्यालयाचे अधिपत्याखाली आहे ते मुख्य अभियंता |

**(V) यंत्रणेची निवड करण्यासाठी निविदा बोलावणे**

उपरोक्त अ.क्र. (I) 3 मधील (i) ते (vii) मार्फत प्रणालीचे विकसन करण्याचे प्रस्ताव असल्यास, व अशा प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समिती किंवा उच्चाधिकार समितीच मान्यता प्राप्त झाली असल्यास, कोणतीही निविदा काढण्याची आवश्यकता नाही. तथा अ.क्र. (I) 3 मधील (viii) मार्फत प्रणाली विकसित करणे प्रस्तावित असल्यास, महारा सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, 1984 तसेच तदअनुषंगाने निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

यातील प्रमुख टप्पे पुढील प्रमाणे आहेत-

i) **निविदा कागदपत्रे** (Tender / Bid Document / Request for Propos

| | |
|---|---|
| (VII) | **Change Request मंजुर करणे**<br>काही विशिष्ट प्रकरणी प्रणाली विकसित करणाऱ्या यंत्रणेमार्फत Change Request मंजुर करावा लागतो. अशा प्रकरणी, संबंधित यंत्रणेकडुन सदर बदल करण्यासाठी लागणारा कालावधी प्रथमत: प्राप्त करावा. तो कालावधी योग्य असल्याबाबत तांत्रिक सल्लागार यांचेकडुन तपासणी करावी. तांत्रिक सल्लागाराचे पद काही कारणास्तव रिक्त असल्यास, सदर कामाची सखोल तपासणी संबंधित उप-अभियंता यांनी करावी. सदर प्रस्ताव योग्य असल्यास, करारनाम्यातील मंजुर दराने अशा प्रकारच्या Change Request सदर प्रकारची निविदा ज्यांनी मंजुर केली त्यांची मान्यता घेण्यात यावी किंवा प्रकल्प अंमलबजावणी समितीने दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्यात यावी. |
| (VIII) | **सुधारीत प्रशासकीय मान्यता**<br>ई-प्रशासन प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान केल्यानंतर प्रकल्पाची अंमलबजावणी करतेवेळी प्रणालीमध्ये कोणताही बदल करणे आवश्यक असल्यास व त्यामुळे प्रकल्पाच्या मंजुर किंमतीमध्ये 10 टक्के किंवा 1 कोटी यापेक्षा जे कमी असेल त्यापेक्षा अधिक वाढ होत असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत तयार करण्यात यावा. अशा बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापुर्वी उपरोक्त (II) नुसार ज्यांनी प्रकल्पास मान्यता दिली आहे, त्यांची मान्यता घेण्यात यावी.<br>प्रकल्प विकसनाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्रणाली वापरात आल्यावर तंत्रज्ञातील प्रगतीमुळे अथवा Version Upgrade अथवा enhancements इ. यामुळे प्रणालीमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास, व अशा बाबी प्रमा प्रस्ताव व करारनामा यामध्ये अंतर्भुत नसल्यास अशा बाबींचा स्वतंत्र प्रस्ताव उपरोक्त नुसार सादर करण्यात यावा. |
| (IX) | **पुर्णत्व अहवाल**<br>ई-प्रशासन प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर पुर्णत्व अहवाल तयार करुन तो उपरोक्त (II) नुसार ज्यांनी मान्यता दिली आहे, त्यांना माहितीस्तव सादर करण्यात यावा. या अहवालामध्ये प्रकल्पामुळे विभागास मिळालेल्या लाभाचा तसेच त्यामधुन मिळालेल्या अनुभवाचा उहापोह करावा. ई-प्रशासन हे नवीन तंत्रज्ञान असल्याने व त्यातील तांत्रिक बाबींचे सखोल ज्ञान विभागाकडे नसल्याने सदर प्रकल्प राबविताना येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची देखील मांडणी पुर्णत्व अहवालामध्ये करण्यात यावी. |
| (X) | **प्रकल्पांचे व्यवस्थापन व हस्तांतरण**<br>ई-प्रशासन प्रणालीचे विकसन करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्यात यावे. यासाठी आवश्यकता भासल्यास ज्यांनी प्रणालीचे विकसन केले आहे त्यांची अथवा नवीन यंत्रणेची नेमणुक उपरोक्त सुचनांचा अवलंब करुन करता येईल.<br>तसेच सदर प्रणालीचे हस्तांतरण करण्यासाठी विकसकाकडुन आवश्यक ते प्रशिक्षण घेण्यात यावे. त्याशिवाय प्रणालीबाबत आवश्यक असलेले Documents, Manuals आदी प्राप्त करुन घेण्यात यावे. प्रत्येक प्रणालीकरिता Admin नेमण्यात यावा, व त्यांनी सदर प्रणालीसाठी आवश्यक असणारी कार्यवाही पार पाडावी.<br>प्रणाली व्यवस्थापनाधीन असताना काही कारणांस्तव जसे - इतर ई-प्रशासन प्रकल्पांसोबत जोडणी करणे, Enhanced Reports विकसित करणे, राहुन गेलेल्या तृटयांचे निराकरण करणे, Government Process Re-engineering च्या अनुषंगाने प्रणालीमध्ये यथायोग्य बदल करणे यासाठी देखील प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत उपरोक्त सुचनांचा अवलंब करुन नवीन यंत्रणेची नेमणुक करता येईल.<br>जलसंपदा विभागाचे संकेतस्थळाचे विकसन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे मार्फत करण्यात आले आहे. शासकीय विभागांच्या संकेतस्थळाचे पर्यवेक्षण करण्यासाठी दि. 21 जुन 2014 रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयान्वये संकेतस्थळ पर्यवेक्षण समिती (Website Oversight Committee) ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच या समितीमार्फत तसेच दि. 5 डिसेंबर 2014 रोजीच्या जलसंपदा विभागाच्या कार्यालयीन आदेशान्वये जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळासाठी वेब माहिती व्यवस्थापक (Web Information Officer) आणि मजकुर पुनर्विलोकन समिती (Content Review |

| | | |
|---|---|---|
| | | Committee) गठित करण्यात आल्या आहेत. या समित्यांमार्फत तसेच शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळामध्ये वेळोवेळी बदल करावे लागतात. या शिवाय नवीन प्रकारची माहिती उपलब्ध करणे, ती अद्ययावत करणे इत्यादी कामे देखील करावे लागतात. जलसंपदा विभागाचे www.wrd.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ ई-जलसेवा प्रणालीमधील मोड्युल एम-0 (M०) असुन, ते मे. विप्रो लिमिटेड यांचे मार्फत विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात उपरोक्त प्रमाणे आवश्यक असणारे बदल मे. विप्रो लि. यांचेमार्फत चालु निविदेमधील तरतुदी - Change Request नुसारच करण्यात यावे. यात अडचण निर्माण झाल्यास, याबाबत शासन मान्यतेने नवीन विकसक नेमण्यात यावा. |